# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ०२ जुलै, २०२५ / आषाढ ११, १९४७ (शके)**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री**
**(३) इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धव्यवसाय विकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री**
**(४) पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री**
**(५) माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्ये मंत्री**
**(६) परिवहन मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३२**

---

## मुंबईतील ३७९ पोलिसांचा कर्तव्यावर असताना मृत्यू झाल्याबाबत

**(१) * २२६८ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलिसांच्या उपलब्ध आकडेवारीनुसार सन २०२२ ते आजमितीपर्यंत कर्तव्यावर असताना ३७९ पोलिसांचा मृत्यू झाला असून यांपैकी २२ जणांनी आत्महत्या केली असल्याची बाब दिनांक ८ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत किंवा मुंबई विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाच्या प्राध्यापकांमार्फत यासंदर्भात प्रत्येक घटनेच्या पार्श्वभूमीची आणि यामागील कारणांची चिकित्सा शासनाने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने कर्तव्यावर असलेल्या पोलिसांचा आकस्मिकरित्या मृत्यू झाल्याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने मुंबई पोलीस दलातील पोलिसांच्या मृत्यूचे प्रमाण कमी करण्याबाबत कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय. हे अंशत: खरे आहे. सन २०२२ ते जून, २०२५ या कालावधीत मुंबई पोलीस दलातील ४२७ पोलीस अधिकारी/अंमलदार यांचा मृत्यू झाला असून त्यापैकी २५ पोलीस अधिकारी/अंमलदार यांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत प्रत्येक घटनेची चिकित्सा करण्यात आली आहे. पोलीस अधिकारी/अंमलदार यांच्या आकस्मिक मृत्यू प्रकरणी त्यांच्या नातेवाईकांकडून संशय व्यक्त न

केल्याने याबाबत कोणतीही चौकशी करण्यात आलेली नाही. मुंबई पोलीस दलातील पोलिसांचे मृत्यूचे प्रमाण कमी करण्याकरीता वैद्यकीय शिबिरे आयोजित करण्यात येतात. तसेच मान्यवर वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून समुपदेशन करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांसाठीच्या धर्मवीर आनंद दिघे आरोग्य तपासणी योजनेत कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२) * २७९२ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांसाठी लागू केलेल्या धर्मवीर आनंद दिघे आरोग्य तपासणी योजनेत कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेची एसटी कर्मचाऱ्यांनी मागणी केली नसतानाही योजना लागू केली असून कर्मचाऱ्यांना वैद्यकीय चाचण्या ठाण्याच्या गुरुकृपा हॉस्पिटलमधून करण्यास सक्ती केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेमुळे राज्य परिवहन महामंडळावर कोटयवधी रुपयांचा आर्थिक भार पडला असून योजनेमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र शासनाच्या धर्तीवर रा.प.महामंडळाच्या कर्मचाऱ्यांसाठी धर्मवीर आनंद दिघे आरोग्य तपासणी योजना घोषीत करण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत कोणत्याही कर्मचाऱ्यांवर गुरुकृपा हॉस्पिटल अथवा अन्य कोणत्याही विशिष्ट हॉस्पिटल अथवा संस्थेमार्फतच सदरच्या वैद्यकीय चाचण्या करण्यासाठी सक्ती करण्यात आलेली नसून,कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झालेला नाही.

-----------------

## राज्यातील मेफेड्रॉन तस्करींचे प्रमाण वाढत असल्याबाबत

**(३) * ३४५० डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र हे मेफेड्रॉन तस्करीचे भारतातील सर्वात मोठे केंद्र म्हणून उदयास आले असून गत ३ वर्षांत देशभरातील मेफेड्रॉनच्या एकूण ७२ ते ९६ टक्के प्रकरणांपैकी १४८६ प्रकरणे ही महाराष्ट्रात नोंदविली गेली असून, सन २०२२ मध्ये २९०, सन २०२३ मध्ये ६४७, आणि सन २०२४ मध्ये ५४९ प्रकरणे नोंदविली गेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गृह विभागाच्या आकडेवारीवरून सिंथेटिक ड्रग्जशी संबंधित गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून राज्यातील बंद पडलेल्या कंपन्या आणि कारखान्यांमध्ये स्वीट पॉयझन, मेफेड्रॉन (एमडी) आणि इतर विविध प्रकारची औषधे तयार केली जात असून, गत ५ वर्षांत एएनसी, मुंबई पोलीस, महसूल गुप्तचर संचालनालय आणि इतर एजन्सींनी यावर छापे टाकून कारवाई केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्याच्या बंदरामध्ये, महामार्गावर आणि बेकायदेशीरपणे प्रयोग शाळांमधून तसेच औषध निर्मिती कारखान्यांमध्ये यांचा सर्रास वापर होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या कारवाईत केवळ अब्जावधी रुपयांचे ड्रग्ज जप्त केले नाहीत तर मोठ्या संख्येने ड्रग्ज तस्करांनाही अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने सदरहू कारखान्यांवर कारवाई करून कारखाने सीलबंद करणे तसेच कंपन्यांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे संरक्षण देणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यात मेफेड्रॉन संदर्भात सन २०२२ मध्ये ३०३ गुन्हे, सन २०२३ मध्ये ६४२ गुन्हे आणि सन २०२४ मध्ये ५४५ गुन्हे नोंदविले आहेत.
(२) गेल्या ५ वर्षांत एएनसी मुंबई पोलीस, महसूल गुप्तचर संचालनालय आणि एनसीबी (नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो) यांनी मेफेड्रॉन या अंमली पदार्थांच्या निर्मिती करणाऱ्या कारखान्यांवर केलेल्या कारवाईची सांख्यिकी माहिती खालीलप्रमाणे आहे.

| एजन्सी | दाखल गुन्हे | अटक आरोपी | जप्त माल (कि.ग्रॅ) |
|---|---|---|---|
| एएनसी मुंबई पोलीस (२०२१-२०२५) | १२ | ७५ | २९०९.९९३ |
| महसूल गुप्तचर संचालनालय (२०२२-२०२५) | ४ | २२ | १७९.०६ |
| एनसीबी (नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो) (२०२३-२०२४) | ३ | - | १८३७ |

(३), (४) व (५) राज्यातील कारखान्यांवर अंमली पदार्थ विरोधी कायदयांतर्गत कारवाई करून मागील ५ वर्षात ५१५१.५८६ किग्रॅ वजनाचा (अंदाजे किंमत ९५२२.२१ करोड) मेफेड्रोन (एमडी) व त्यासाठी लागणारा कच्चा माल जप्त करण्यात आला असून एकूण ११६ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

अंमली पदार्थ तस्करी तसेच विक्रीवर आळा घालण्यासाठी शासन खालीलप्रमाणे उपाययोजना करते.

राज्यात अंमली पदार्थ तस्करांविरुध्द विशेष मोहीमा, ड्रग्ज मुक्त अभियान, शाळा महाविद्यालयांमध्ये जनजागृती कार्यक्रम तसेच वाहन रॅली व पथनाट्ये आयोजनाद्वारे अंमली पदार्थ सेवन व विक्री न करण्याबाबत जनजागृती करण्यात येते.

राज्यात अंमली पदार्थाच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकामध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केलेले आहेत.

केंद्र शासनाच्या दिनांक २५/०३/२०२२ च्या आदेशान्वये नार्कोकोऑर्डीनेशन यंत्रणेची पुनर्रचना करण्यात आली असून त्यानुसार दिनांक ३१/०८/२०२३ च्या शासन निर्णयाने अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) ची स्थापना करण्यात आली आहे. शासन निर्णय दिनांक ०६/०८/२०२४ अन्वये अंमली पदार्थ टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राज्यासाठी NCORD (Narco-Coordination centre) सचिवालय म्हणून व विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) यांची राज्यस्तरीय नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स करीता दिनांक १९/०३/२०२५ रोजीच्या शासन निर्णय क्र एपीओ-३१२३/प्र.क्र.८२/पोल-३ अन्वये एकूण ३४६ पदे नव्याने निर्माण करण्यात आली आहेत.

अंमली पदार्थावर आळा घालण्यासाठी राज्यस्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समिती व जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समितीची स्थापना करण्यात आली असून सदर समित्यांकडून अंमली पदार्थावर आळा घालण्याबाबत वेळोवेळी आढावा घेतला जातो.

दरवर्षी २६ जून रोजी जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन साजरा केला जातो. या वर्षी दिनांक १२ जून, २०२५ ते २६ जून, २०२५ या कालावधी दरम्यान राज्यात अंमली पदार्थ विरोधी पंधरवडा अभियान राबविण्यात येत आहे सदर कालावधीत अंमली पदार्थ विरोधी कक्ष, स्थानिक पोलीस ठाणे तसेच अशासकीय संस्था मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळा, महाविद्यालय, रेल्वे स्थानक, महत्वाचे चौकांमध्ये अंमली पदार्थ विरोधी पोस्टर्स, बॅनर्स तसेच पथनाट्यद्वारे जनजागृती केली जाते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात ई- वाहनांकरीता चार्जिंग सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(४) * २७४४ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विदयुत वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाच्या धोरणातंर्गत ई-वाहनांना टोलमाफी व अनेक सवलती जाहीर करण्यात आल्या असून नवीन धोरणानुसार राष्ट्रीय आणि राज्य महामार्गांवर प्रत्येक २५ किलोमीटर अंतरावर चार्जिंग सुविधा उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात ३७०० पेक्षा जास्त चार्जिंग पॉईंट्स कार्यरत असून लोकसंख्येच्या तुलनेत व इलेक्ट्रीकल वाहनांच्या तुलनेत हे पॉइंट्स कमी असल्याने ग्रामीण व निमशहरी भागात खासगी भागीदारीतून चार्जिंग स्टेशनची वाढ करण्यात येणार असून चारचाकी ईव्ही आणि इलेक्ट्रिक बस यांना शिवडी-न्हावाशेवा अटल सेतू, मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे आणि मुंबई-नागपूर समृध्दी महामार्गावर पूर्ण

टोलमाफी तर राष्ट्रीय व राज्य महामार्गावर ५० टक्के टोलमाफी देण्याचा निर्णय दिनांक २९ एप्रिल, २०२५ रोजी घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हानिहाय ईव्ही चार्जिंग स्टेशन स्थापनेसाठी सुस्पष्ट नकाशा (रोडमॅप) जाहीर करून ईव्ही चार्जिंग स्टेशन्स उभारण्यासंबंधी महावितरणतर्फे "पॉवर ईव्ही" ॲप व पोर्टलची सुविधा देऊन याचा प्रचार व प्रसार वाढविण्यासाठी तसेच राज्यातील इलेक्ट्रिक वाहनांना टोलमुक्ती देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण-२०२५ हे दिनांक २३/०५/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आले आहे. राज्यभरात इलेक्ट्रिक वाहनांचा स्वीकार होण्यासाठी राज्यामध्ये चार्जिंग विषयक पायाभूत सुविधांचा विकास करणे, राज्य व राष्ट्रीय महामार्गावर प्रत्येक २५ किमी अंतराने इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग सुविधांची उभारणी करण्याची बाब या धोरणात समाविष्ट आहे. तसेच धोरणातंर्गत इलेक्ट्रिक वाहनांच्या अनुषंगाने प्रोत्साहने जाहीर करण्यात आलेली आहेत. मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग, हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग या महामार्गांवर आणि अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतूवर प्रवासी इलेक्ट्रिक वाहनांना १००% पथकर माफी या धोरणान्वये देण्यात आली आहे. इलेक्ट्रिक वाहनांच्या अनुषंगाने चार्जिंग स्टेशन उभारण्याकरीता निश्चित संख्येच्या मर्यादेमध्ये प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्वानुसार पात्र घटकांना / लाभार्थ्यांना प्रोत्साहन अनुदान देण्याची तरतूद सदर धोरणामध्ये नमूद आहे. महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण-२०२५ अंतर्गत चार्जिंग विषयक सेवा देण्याबाबतची कार्यवाही ऊर्जा विभाग, नगरविकास विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यामार्फत करण्यात येणार असून परिवहन विभागाकडून सदर विभागांशी समन्वय साधून मार्गदर्शक तत्वे व कृती आराखडा तयार करण्याची बाब देखील सदर धोरणामध्ये समाविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील धर्मादाय रुग्णालयांमध्ये रुग्णमित्राची नेमणूक करण्याबाबत

**(५) * २४९९ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ, श्री.वसंत खंडेलवाल :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-(१) राज्यातील गरीब व निर्धन रुग्णांसाठी काही टक्के खाटा धर्मादाय रुग्णालयामध्ये ठेवणे बंधनकारक असतानाही अनेकदा यासंदर्भातील कोणतीही माहिती रुग्णांना दिली जात नसल्याने प्रत्येक रुग्णालयामध्ये ही माहिती देण्यासाठी रुग्णमित्राची नेमणूक करण्याची मागणी आरोग्य मित्र व रुग्णांसाठी काम करणाऱ्या संस्थांनी माहे एप्रिल, २०२५ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने धर्मादाय रुग्णालयात रुग्णमित्राची नेमणूक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम ४१ अअ मधील तरतूद व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी तयार केलेल्या योजनेप्रमाणे धर्मादाय रुग्णालयात कार्यान्वित खाटांपैकी निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी प्रत्येकी १० टक्के खाटा राखीव ठेवणे बंधनकारक आहे.

तथापि, प्रत्येक रुग्णालयामध्ये राखीव खाटांची माहिती देण्यासाठी रुग्णामित्राची नेमणूक करावी अशी आरोग्य मित्र व रूग्णांसाठी काम करणाऱ्या संस्थांनी मागणी केल्याची बाब निदर्शनास आली नाही. तथापि, श्री.अंकुशदादा वसंत कुराडे यांनी दिनांक ११/०३/२०२५ रोजी धर्मादाय आरोग्य सेवक यांची पदे तातडीने भरण्यात यावीत असे पत्र धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयास प्राप्त झालेले आहे.

(२) धर्मादाय संघटनेच्या आस्थापनेवर धर्मादाय रुग्णालयांमध्ये धर्मादाय आरोग्य सेवकांच्या १८६ मनुष्यबळ सेवा बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यास विधि व न्याय विभागाच्या दिनांक ०९/१०/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे धर्मादाय रुग्णालयांमध्ये १८६ धर्मादाय आरोग्य सेवकांच्या सेवा बाह्ययंत्रणेद्वारे घेण्याबाबत निविदा सूचना (Tender Notice) GeM Portal वर प्रसिध्द करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात लाखो गुंतवणूकदारांची सायबर फसवणूक टाळण्यासाठी आर्थिक गुप्तवार्ता कक्षांची स्थापना करण्याबाबत

**(६) * २४७४ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती चित्रा वाघ, अॅड.निरंजन डावखरे, श्री.वसंत खंडेलवाल, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुंबईसह मागील १० वर्षात विविध गुंतवणूक योजनांद्वारे ५१ लाख गुंतवणूकदारांची १५,५०० कोटी रुपयांची फसवणूक तसेच डिजिटल अरेस्ट, ओ.टी.पी. पासवर्ड विचारून फसवणूक, सेक्सटॉरशन, शेअर ट्रेडिंग अशा पध्दतीच्या गुन्हयांमध्ये रुपये ७,६३४ लाख कोटी रूपयांची फसवणूक झाल्याची बाब माहे एप्रिल-२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२४ मध्ये राज्यात अंदाजे ८११ कोटी रुपयांच्या नुकसानीचे सायबर फसवणुकीचे व्यवहार झाले असून, मुंबईमध्ये ५४,८३६, पुण्यामध्ये २६,३३२ आणि ठाण्यामध्ये २३,१४८ गुन्ह्यांची नोंद झाली आहे तसेच अकोला जिल्ह्यात ऑनलाइन फसवणुकीच्या वेगवेगळया युक्त्या वापरून मागील चार महिन्यांत ५९५ नागरिकांची सायबर गुन्हेगारांनी फसवणूक केली असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पिंपरी चिंचवड येथे मोठ्या कंपन्या असून सदर कंपन्यासोबत ई-मेल किंवा सोशल मिडियाच्या विविध प्लॅटफॉर्मवरुन हे गुन्हेगार संपर्क साधून कर्मचाऱ्यांची फसवणूक करून त्यांचेकडून जमवलेली रक्कम चिनी बॅंकेच्या खात्यामध्ये जमा करित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात एकूण ५० सायबर पोलीस ठाणे कार्यान्वित केल्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशनात जाहीर केले असून राज्यातील गुंतवणूकदारांची फसवणूक टाळण्यासाठी सायबर पोलीस ठाणे तसेच मुंबईत व प्रत्येक जिल्ह्यात आर्थिक गुप्तवार्ता कक्षांची स्थापना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, राज्यातील लाखो गुंतवणूकदारांची सायबर मार्फत फसवणूक टाळणे, गुन्हेगारांचा तपास तातडीने करणे, त्यांच्यावर कठोर स्वरूपाची कारवाई करणे, नागरिकांमध्ये जनजागृती करणे, इत्यादींसाठी तसेच सायबर गुन्हयात होत असलेली वाढ रोखण्यासाठी अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करुन मुंबईसह प्रत्येक जिल्ह्यात आर्थिक गुप्तवार्ता कक्षांची स्थापना करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय. अंशत: खरे आहे.

राज्यात मुंबई वगळून मागील १० वर्षात विविध गुंतवणूक योजनांद्वारे साधारणत: १०५ लक्ष गुंतवणूकदारांची रुपये २२,५५२ कोटी इतक्या रकमेची फसवणूक झालेली आहे. तर आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांच्या माहितीनुसार गेल्या १० वर्षात विविध गुंतवणूक योजनांद्वारे साधारणत:२.७१ लक्ष गुंतवणूकदारांची रुपये २,९५,४५१ कोटी इतक्या रकमेची फसवणूक झालेली आहे. सन २०१६ पासून मे २०२५ पर्यंत दाखल सायबर गुन्हे ज्यामध्ये आर्थिक फसवणूक झाली असे ४६,३२१ गुन्हे दाखल असून त्यामध्ये रुपये ११,०३३.९७ कोटी रुपयांची फसवणूक झाली आहे.

(२) होय. अंशत: खरे आहे.

महाराष्ट्रात नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टल वर सन २०२४ मध्ये एकूण ५८,१५७ तक्रारी प्राप्त असून त्यामध्ये ११८६.४६ कोटी रुपयांची फसवणूक झाली आहे. मुंबईमध्ये ३१,५८३, पुण्यामध्ये १३,९७१ आणि ठाण्यामध्ये १२,५८२ तक्रारी प्राप्त आहेत. अकोला घटकात सन २०२५ मध्ये नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टल वर एकूण ५४० तक्रारी प्राप्त असून ०२ गुन्हे दाखल आहेत.

(३) होय. अंशत: खरे आहे.

पिंपरी चिंचवड आयुक्तालयातंर्गत सायबर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा रजि.नं. १७/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३१६(२), ३१८(४), ३१९, ३३६(३), ३(५) सह माहीती तंत्रज्ञान अधिनियम (सुधारीत) कायदा, २००८ चे कलम ६६ (डी) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. यातील फिर्यादी हे एका आंतरराष्ट्रीय कंपनीत कार्यकारी संचालक म्हणून काम करतात. यांना कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी व कायदे सल्लागार प्रतिनिधी भासवून बनावट व्हॉट्सॲप क्रमांकाद्वारे आणि ई-मेलद्वारे फिर्यादींशी संपर्क साधण्यात आला. कंपनीस चीन येथे गुंतवणूक करावयाचे असल्याचे सांगून काही रक्कम चीन येथील एका बँक खात्यामध्ये जमा करण्यास सांगितले. बनावट व्हॉट्सॲप क्रमांकाद्वारे आणि ई-मेलद्वारे प्राप्त कागदपत्रांवर व माहितीवर फिर्यादींचा विश्वास बसल्याने त्यांनी रक्कम बँक खात्यात जमा केली. परंतु नंतर फिर्यादींना त्यांची फसवणूक झाल्याचे समजले.

(४) होय. हे अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत राज्यात ५० सायबर पोलीस ठाणे कार्यन्वित आहेत.

गुंतवणूकदारांची आर्थिकदृष्ट्या फसवणूक करणाऱ्या योजनांबाबत आगाऊ माहिती प्राप्त करुन कारवाई करण्यासाठी मुंबई पोलीस अंतर्गत तसेच राज्यात प्रत्येक पोलीस घटकांतर्गत (पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक) "आर्थिक गुप्तवार्ता कक्षाची (Financial Intelligence Unit)" स्थापना करण्यात आली आहे.

(५) गुन्ह्याचा तपास जलद गतीने व्हावा यासाठी पोलीस आयुक्त व जिल्हा पोलीस घटक स्तरावरील सायबर लॅब व सायबर पोलीस ठाणे यांना अत्याधुनिक यंत्रसामुग्री (सॉफ्टवेअर व हार्डवेअर) देण्यात आले आहेत. तसेच अधिकारी व अंमलदार यांना सायबर गुन्ह्यांचे उकल करण्याच्या अनुषंगाने प्रशिक्षण देण्यात आले आहे. महाराष्ट्र सायबर कार्यालयात अदयावत अशी CCPWC Lab स्थापन करण्यात आलेली आहे. जनजागृती कार्यक्रमातुन सामान्य नागरिक, विद्यार्थी, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी, अशा सर्व विविध स्तरापासून ते सामान्यांपर्यंत जनजागृती केली जात आहे. तसेच सोशल मिडीयाद्वारे, इंटरनेट माध्यमांद्वारे सर्व सामान्य नागरीकांना गुन्हयांच्या अनुषंगाने सावध राहण्याचे आवाहन केले जात आहे.

गुंतवणूकदारांची आर्थिकदृष्ट्या फसवणूक करणाऱ्या योजनांबाबत आगाऊ माहिती प्राप्त करुन कारवाई करण्यासाठी मुंबई पोलीस अंतर्गत तसेच राज्यात प्रत्येक पोलीस घटकांतर्गत (पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक) "आर्थिक गुप्तवार्ता कक्षाची (Financial Intelligence Unit)" स्थापना करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केएसके महाविद्यालयातील (जि.बीड) कला शाखेत शिक्षण घेत असलेल्या मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याबाबत

**(७) * २४२४ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केएसके महाविद्यालय (जि.बीड) येथे कला शाखेच्या तृतीय वर्षात शिक्षण घेत असलेल्या २० वर्षीय तरुणीची काही तरुणांनी छेड काढून अनैतिक कृत्य करतानाचे व्हिडीओ तसेच फोटो काढून त्याद्वारे तिला ब्लॅकमेल करुन लैंगिक अत्याचार केल्यामुळे सदर तरुणीने धाराशिव येथे तिच्या नातेवाईकाच्या घरी आत्महत्या केली असल्याची बाब नुकतीच माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पीडित मुलीच्या आईने मा.उपमुख्यमंत्री यांच्याकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड जिल्ह्यातील पीडित तरुणीवरील सदर अन्यायाच्या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने दोषीविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच पीडित मुलीला न्याय मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे फिर्यादीवरुन धाराशिव शहर पोलीस ठाणे, धाराशिव येथे गु.र.नं.१२०/२०२५, कलम १०८, ३(५) बी.एन.एस. २०२३ सह कलम ३ (१)(r) अनुसुचीत जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम,१९८९ अन्वये दिनांक १८/०३/२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(२) सदर प्रकरणी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे कार्यालयास तक्रार करण्यात आली आहे.

(३) सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपी यास दिनांक ०३/०४/२०२५ रोजी अटक करण्यात आली असून, दिनांक १६/०४/२०२५ रोजी मा.न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. तसेच आरोपी क्र.२ यास मा.उच्च न्यायालयाने क्रिमीनल बेल क्रमांक २८२/२०२५ मध्ये दिनांक १३/०६/२०२५ रोजी अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे.

गुन्ह्यातील मयत पीडिता, आरोपी, साक्षीदार यांचे मोबाईल तपासणी कामी न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा येथे तपासणीकरीता पाठविण्यात आले आहेत. तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस थांब्यांवर सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत**

**(८) * २८२६ श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.योगेश टिळेकर, श्रीमती चित्रा वाघ, श्री.संजय केणेकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसच्या लांब पल्ल्याच्या प्रवासादरम्यान बसचा थांबा असलेल्या हॉटेलवर प्रवाशांना चांगल्या सुविधा मिळत नसतील तर ते थांबे रद्द करण्याचे निर्देश मा.परिवहन मंत्री महोदयांनी दिले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात सद्य:स्थितीत सुरू असलेल्या सर्व बस थांब्याचे सर्वेक्षण करून त्याचा अहवाल पुढील १५ दिवसांत सादर करण्याच्या सूचना देखील त्यांनी राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस थाब्यांवरील असुविधा, पुरुषांच्या विशेषतः महिलांसाठीच्या शौचालयांची दयनीय अवस्था असून हॉटेलमधील अन्नपदार्थाचे दर अनाठायी वाढवून ठेवल्यामुळे प्रवाशांची आर्थिक फसवणूक होत असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बस थाब्यांवरील सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यावश्यक सेवा आणि त्यामध्ये मूलभूत सुविधा असणे गरजेचे असताना देखील त्यावर अद्याप कोणतीही कारवाई परिवहन विभागाकडून करण्यात आलेली नसून, बस थाब्यांवरील चांगल्या दर्जाच्या अत्यावश्यक सेवा व मूलभूत सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) होय.

(२), (३), (४) व (५) ज्या अधिकृत हॉटेल/ मोटेल ठिकाणी अनियमीतता / त्रुटी आढळली आहे, अशा हॉटेल / मोटेल चालकावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. तसेच नविन हॉटेल -मॉटेल धोरण तयार करण्यात आले आहे.

-----------------

## नवी मुंबई पोलिसांनी एपीएमसी फळमार्केट येथील बांगलादेशीय नागरिकांकडून अंमली पदार्थ जप्त केल्याबाबत

**(९) * ३४१८ श्री.संजय खोडके, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई पोलिसांनी एपीएमसी फळमार्केट येथील ५० बांगलादेशीय नागरिकांना चौकशीसाठी ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थ जप्त करण्यात आले असून कोकणातील मुंबई, ठाणे, पालघर, नवी मुंबई या जिल्ह्यांसह यवतमाळ, धाराशिव, पुणे, सांगली, अमरावती व नागपूर जिल्हयांमधून पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर अंमली पदार्थ जप्त केले असल्याची बाब माहे एप्रिल-मे २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबई एपीएमसी फळमार्केट येथील बांगलादेशीय नागरिक फळविक्रीच्या माध्यमातून अंमली पदार्थांची विक्री करित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे जानेवारी, २०२५ ते माहे मे, २०२५ या कालावधीत राज्यात कोणकोणत्या ठिकाणी पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली व त्यामध्ये काय आढळून आले आहे,

(४) असल्यास, राज्यात अशाप्रकारे फळविक्री करणारे अथवा इतर बाजारात फळविक्री करणाऱ्या बांगलादेशीय नागरिकांची चौकशी करण्याबाबत व राज्यातील अंमली पदार्थांची विक्री यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) पोलीस आयुक्त,नवी मुंबई यांच्या कार्यक्षेत्रातील वाशी विभागातील एपीएमसी पोलीस ठाणे अंतर्गत फळ मार्केट परिसरात दिनांक ०२ मे, २०२५ रोजी कोंबीग ऑपरेशन दरम्यान ५० संशयीत बांगलाभाषिक नागरिकांना ताब्यात घेण्यात आले होते. सदर नागरिकांच्या चौकशीमध्ये कोणीही बांगलादेशी नागरिक असल्याचे निष्पन्न न झाल्याने त्यांना मुक्त करण्यात आले आहे. तसेच त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेला नाही.

तसेच मुंबई, ठाणे, नवी मुंबई, यवतमाळ, धाराशीव, पालघर, पुणे, सांगली, अमरावती, नागपूर व कोकणातील जिल्ह्यांमध्ये पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर अंमली पदार्थ जप्त केले असल्याची बाब माहे एप्रिल-मे २०२५ दरम्यान निदर्शनास आलेली नाही.

(३) माहे जानेवारी, २०२५ ते माहे मे, २०२५ या कालावधीत राज्यातील विविध ठिकाणी छापा टाकून पोलीसांनी ८२१८ गुन्हे दाखल केले आहेत. त्यामध्ये ७११० आरोपींना अटक केली असून रुपये ३०२,०९,०३,२६८/- इतक्या किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(४) राज्यात वेळोवेळी परदेशी/ बांग्लादेशी नागरिक यांच्याबाबत गोपनिय माहिती घेवून, राहत असलेल्या ठिकाणी कोम्बींग ऑपरेशन करुन, अंमली पदार्थांची विक्री, पुरवठा व तस्करी इत्यादी करताना मिळून आल्यास त्यांच्याविरुध्द एनडीपीएस ॲक्ट अन्वये कारवाई करण्यात येते.

राज्यात सन २०२४ ते मार्च २०२५ पर्यंत अंमली पदार्थ कायद्यांतर्गत सेवनार्थीच्या विरुध्द १९२०६ गुन्हे दाखल असून १६९०५ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे तसेच अंमली पदार्थ ताब्यात बाळगणे/वाहतूक करणे संदर्भात एकूण ३५२१ गुन्हे दाखल झालेले असून ४७६५ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे व एकूण रुपये ४३३८.९० कोटी किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेले आहेत.

अंमली पदार्थ तस्करी तसेच विक्रीवर आळा घालण्यासाठी शासन खालीलप्रमाणे उपाययोजना करते.

- राज्यात अंमली पदार्थ तस्करांविरुध्द विशेष मोहीमा, ड्रग्ज मुक्त अभियान, शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती कार्यक्रम तसेच वाहन रॅली व पथनाट्ये आयोजनाद्वारे अंमली पदार्थ सेवन व विक्री न करण्याबाबत जनजागृती करण्यात येते.

- राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकामध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केलेले आहेत.

- केंद्र शासनाच्या दिनांक २५/०३/२०२२ च्या आदेशान्वये नार्कोकोऑर्डीनेशन यंत्रणेची पुनर्रचना करण्यात आली असून त्यानुसार दिनांक ३१/०८/२०२३ च्या शासन निर्णयाने अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) ची स्थापना करण्यात आली आहे. शासन निर्णय दिनांक ०६/०८/२०२४ अन्वये अंमली पदार्थ टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राज्यासाठी NCORD (Narco-Coordination centre) सचिवालय म्हणून व विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) यांची राज्यस्तरीय नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स करीता दिनांक १९/०३/२०२५ रोजीच्या शासन निर्णय क्र. एपीओ-३१२३/प्र.क्र.८२/पोल-३ अन्वये एकूण ३४६ पदे नव्याने निर्माण करण्यात आली आहेत.

- अंमली पदार्थावर आळा घालण्यासाठी राज्यस्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समिती व जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समितीची स्थापना करण्यात आली असून सदर समित्यांकडून अंमली पदार्थावर आळा घालण्याबाबत वेळोवेळी आढावा घेतला जातो.

- दरवर्षी २६ जून रोजी जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन साजरा केला जातो. या वर्षी दिनांक १२ जून, २०२५ ते २६ जून, २०२५ या कालावधी दरम्यान राज्यात अंमली पदार्थ विरोधी पंधरवडा अभियान राबविण्यात येत आहे. सदर कालावधीत अंमली पदार्थ विरोधी कक्ष, स्थानिक पोलीस ठाणे तसेच अशासकीय संस्था मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळा, महाविद्यालय, रेल्वे स्थानक, महत्वाचे चौकांमध्ये अंमली पदार्थ विरोधी पोस्टर्स, बॅनर्स तसेच पथनाट्यद्वारे जनजागृती केली जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## चंद्रपूर वीज केंद्राच्या राख साठवणूक तलावाच्या कामाचे मुरुम, रबल आणि मातीची चोरी होत असल्याबाबत

**(१०) * ३३३० श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर वीज केंद्राच्या राख साठवणूक तलावाची (ॲशबंड) क्षमता संपली असल्याने तलावाची उंची तीन मीटरने वाढविण्याचे काम एस एम एम कंपनीला मिळाले असून या कामासाठी लागणारे मुरुम, रबल (मोठे दगड) आणि मातीची चोरी केली जात असल्याची बाब माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वामित्वधन (रॉयल्टी) वाचविण्यासाठी कंत्राटदाराकडून राख साठवूणक तलावा लगतच मोठ्या प्रमाणात अवैध उत्खनन सुरु असल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी असलेल्या कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्रामधील निर्माण झालेल्या राखेची विल्हेवाट लावण्यासाठी, महाजेनको (पूर्वी MSEB) ने महाराष्ट्र जलसंपदा विभागाच्या अंतर्गत मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना (CDO), नाशिक यांचेकडून प्राप्त आराखड्यानुसार सन १९८४ मध्ये राख बंधारा बांधलेला आहे. सदर बंधाऱ्याची क्षमता संपल्यामुळे ३ वेळा उंची वाढविण्यात आली आहे.

राख बंधाऱ्याची क्षमता संपल्यामुळे बंधाऱ्याची उंची ४ थ्या वेळेस वाढविण्याचे काम खुल्या निविदेव्दारे मेसर्स एस.एम.एस. लि., नागपूर या कंत्राटदारास देण्यात आले आहे.

सदर कामाची उंची वाढवण्यासाठी मुरुम, रबल आणि माती आवश्यक असते. यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर तसेच तहसिलदार, भद्रावती यांच्याकडून पारीत केलेल्या अल्प/तात्पुरत्या मुदतीचा गौण खनिज उत्खनन परवाना आदेश पत्र प्राप्त करुनच व त्यांनी नमूद केलेल्या गटातूनच रितसर मुरुम व माती या खनिजांची उचल केली जात आहे.

सदर कामासाठी कार्यादेशाप्रमाणे कंत्राटदाराकडून रुपये १७.०४ कोटी शासनास स्वामित्व शुल्कापोटी भरण्यात आले असून महानिर्मिती कंपनीकडून कंत्राटदारास गौण खनिजासाठी रुपये १६.९७ कोटी परत करण्यात आले.

(२) हे खरे नाही.

राख साठवणूक तलावालगतची माती व फ्लाय ॲश ही ॲशबंडच्या विकास कामांतर्गत मोडत असल्यामूळे त्यांच्या वापरावर शासन निर्णय परिपत्रक क्र.गौखनि १०/१०१२/प्र.क्र.६०३/खं दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२१ अनुसार "ज्यावेळी जमीनीचा एखाद्या भूखंडाचा विकास करतांना मातीचे उत्खनन करुन ती माती त्याच भूखंडाच्या सपाटीकरणाकरीता वापरली जाईल किंवा ती अशा भूखंडाच्या विकासाच्या प्रक्रियेतील कोणत्याही कामासाठी वापरली जाईल, त्यावेळी अशा मातीवर स्वामित्वधन आकारले जाणार नाही."

कंत्राटदाराने ती जागा समतल राहील अशाप्रकारे उत्खनन केलेले आहे.
(३) चौकशी करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परिवहन विभागाच्या इंटरसेप्टर वाहनांच्या रडार खरेदीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(११)** * **२५६३ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परिवहन विभागाच्या इंटरसेप्टर वाहनांच्या रडार खरेदीमध्ये गैरव्यवहार करून नियमांचे उल्लंघन करण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विशिष्ट कंपनीला फायदा होण्यासाठी ही प्रक्रिया राबविताना परिवहन आयुक्त व सह परिवहन आयुक्त यांनी गैरव्यवहार केला असल्याची तक्रार उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी मा.परिवहन मंत्री महोदयांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या जेम पोर्टलवर उपलब्ध असणाऱ्या उपकरणाची खरेदी न करता आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी एका विशिष्ट उद्योग समूहास फायदा व्हावा म्हणून संबंधितांना बेकायदेशिररित्या कार्यादेश देण्यात आला असल्याचेही माहे एप्रिल-२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री.प्रताप सरनाईक :** (१) व (२) परिवहन विभागातील वायुवेग पथकांसाठी खरेदी करण्यात आलेल्या ६९ इंटरसेप्टर वाहनांच्या रडार खरेदीमध्ये झालेल्या घोटाळयाबाबत/ भ्रष्टाचाराबाबतची तक्रार उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, सातारा यांनी राज्यमंत्री (परिवहन) व अपर मुख्य सचिव (परिवहन) यांच्याकडे केली आहे.
(३), (४) व (५) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/ भाग-III/ उद्योग-४, दिनांक ०१/१२/२०१६ अन्वये "शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारित नियम पुस्तिका" यास मान्यता दिली आहे. त्यानुसार विहित अटी व शर्तीनुसार सदर उपकरणे खरेदी प्रक्रिया पारदर्शक पध्दतीने पार पाडण्यात आली आहे.

-----------------

## पुण्यातील धर्मादाय रूग्णालयांची चौकशी करण्याबाबत

**(१२)** * **२५६६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर, श्रीमती चित्रा वाघ, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमित गोरखे, श्री.प्रसाद लाड, श्री.संजय खोडके, श्री.संजय केणेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील दिनानाथ मंगेशकर धर्मादाय रुग्णालयात श्रीमती ईश्वरी (तनिष्का) भिसे या महिलेस दिनांक २८ मार्च, २०२५ रोजी प्रसुतीसाठी दाखल करून घेण्याकरीता दहा लक्ष रुपये अनामत रक्कम भरण्याची सक्ती स्त्री रोग व प्रसूतीशास्त्र विभागाचे डॉ. सुश्रृत घैसास यांनी केली असल्याची तसेच पेशंटच्या नातेवाईकांनी तीन लाख रुपये भरण्याची तयारी दर्शविली असतानाही दवाखान्यात दाखल करून न घेतल्याने गर्भवती महिलेला महाराष्ट्र शुश्रूषागृह नोंदणी नियम, २०२१ मधील आपत्कालीन सेवेच्या तरतुदींचा भंग करून गोल्डन अवर्समध्ये साडे पाच तास पेशंटवर कोणतेही उपचार न केल्याने प्रसूतीनंतर अतिरक्तस्त्रावामुळे दिनांक ३१ मार्च, २०२५ रोजी मणिपाल हॉस्पिटल येथे त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयातील डॉक्टर, प्रशासक यांनी ग्रीव्हन्स रिड्रेसल सिस्टीम, धर्मादाय कक्ष व जनसंपर्क अधिकारी यांनी धर्मादाय योजनेची माहिती, खर्चाचे विवरण व सल्ला न देता, समुपदेशनाच्या कर्तव्यात दुर्लक्ष करून सदर गर्भवती महिलेला धर्मादाय योजनेंतर्गत पात्र असतानाही दाखल करून घेतले नसल्याने उपसंचालक, आरोग्य सेवा पुणे मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या पाच सदस्य समितीने प्राथमिक चौकशीच्या अहवालात दोषी ठरविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गर्भवती श्रीमती ईश्वरी (तनिष्का) भिसे यांच्या मृत्यू प्रकरणी इंडियन मेडिकल कौन्सिलच्या नियमांचे उल्लंघन झाल्याने दिनानाथ मंगेशकर धर्मादाय रुग्णालयाचे डॉ. घैसास यांची मेडिकल लायसन्स रद्द करून सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करणेबाबत तसेच धर्मादाय सहआयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या चौकशी समिती अहवालात दिनानाथ मंगेशकर धर्मादाय रुग्णालयाने IPF योजनेचे ३६ कोटी ४८ लक्ष रुपये रुग्णांवर खर्च केल्याची गंभीर बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुणे शहरातील ५८ पैकी १२ रुग्णालयांनी एकही गरीब रुग्णांसाठी बेड राखीव ठेवले नसल्याने नियमानुसार त्यांच्यावर कमी दरामध्ये किंवा मोफत उपचार केले जात नसल्याचे आढळून आले आहे तसेच दिनानाथ मंगेशकर धर्मादाय रुग्णालयाच्या गलथान कारभाराचे व राखीव खाटांचे मेडिकल ऑडीट करून तसेच गर्भवती श्रीमती ईश्वरी (तनिष्का) भिसे या महिलेच्या मृत्यूच्या चौकशी संदर्भातील अहवालानुसार दोषींवर कारवाई करण्याबाबत व पुणे शहरातील व जिल्ह्यातील सर्व रुग्णालयांचा तातडीने आढावा घेऊन गरीब व गरजू रुग्णांना देय असणाऱ्या सर्व सुविधा देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) दिनानाथ मंगेशकर धर्मादाय रुग्णालयात प्रसुतीकरीता आलेल्या श्रीमती ईश्वरी (तनिषा) भिसे या महिलेस १० लक्ष रुपये अनामत रक्कम भरणे शक्य न झाल्याने सदर महिलेवर वेळेत उपचार न केल्यामुळे प्रसुतीनंतर मृत्यू झाल्याची बाब निदर्शनास आल्यामुळे धर्मादास सह आयुक्त, पुणे यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली होती.

(२) सार्वजनिक आरोग्य विभागाकडून प्राप्त माहितीनुसार हे खरे आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाने दिनांक ४/०४/२०२५ रोजी नियुक्त करण्यात आलेल्या समितीच्या अहवालानुसार डॉ. घैसास यांच्याकडून Indian Medical Council (Professional Conduct, Etiquette and Ethics) Regulations, २०२२ मधील १.८ चे पालन झाले नसल्याचे निदर्शनास आल्यामूळे डॉ. घैसास यांच्याविरुध्द महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई यांचेमार्फत कारवाई करण्याबाबत वैद्यकीय शिक्षण विभागास सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

(३) विधि व न्याय विभागाच्या दिनांक ०४ एप्रिल, २०२५ च्या शासन निर्णयान्वये गठीत चौकशी समितीच्या अहवालात डॉ. घैसास यांचे मेडिकल लायसन्स रद्द करून सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करणेबाबत सदर चौकशी समितीच्या अहवालात कोणतीही शिफारस केलेली नाही किंवा तसा निष्कर्ष नोंदविला नाही. तथापि, सार्वजनिक आरोग्य विभागाने दिनांक ४/०४/२०२५ रोजी नियुक्त करण्यात आलेल्या समितीच्या अहवालानुसार डॉ. घैसास यांच्याकडून Indian Medical Council (Professional Conduct, Etiquette and Ethics) Regulations, २०२२ मधील १.८ चे पालन झाले नसल्याचे निदर्शनास आल्याने डॉ. घैसास यांच्याविरुध्द महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई यांचेमार्फत कारवाई करण्याबाबत वैद्यकीय शिक्षण विभागास सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत कळविण्यात आले आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई यांचेमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे

दिनानाथ मंगेशकर धर्मादाय रुग्णालयाकडे निर्धन रुग्ण निधी (IPF) खात्यामध्ये माहे मार्च, २०२५ अखेर रुपये ३४ कोटीपेक्षा आधिकचा आय. पी. एफ. निधी शिल्लक होता असे धर्मादाय सह आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीने आपल्या अहवालात नमूद केले आहे.

(४) पुणे शहरातील ५८ पैकी १२ रुग्णालयांनी एकही गरीब रुग्णांसाठी बेड राखीव ठेवले नसल्याने नियमानुसार त्यांच्यावर कमी दरामध्ये किवा मोफत उपचार केले जात नसल्याचे निदर्शनास आलेले नाही.

तसेच दिनांक २१/०४/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये धर्मादाय रुग्णालयांनी निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी असलेल्या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेबाबत सूचना दिल्या आहेत. तसेच, धर्मादाय आयुक्त कार्यालयामार्फतही धर्मादाय रुग्णालयांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच सौ. ईश्वरी (तनिष्का) भिसे या महिलेच्या मृत्यूच्या चौकशी संदर्भातील अहवालानुसार महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम ४१ अअ मधील तरतुदीचे उल्लंघन केल्यामुळे कलम ६६ख प्रमाणे कार्यवाही का करण्यात येवू नये याबाबतची नोटीस संबंधित न्यासाच्या विश्वस्तांना अध्यक्षा, देखरेख समिती यांनी दिलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघातील भविष्य निर्वाह निधीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१३) * ३४५६ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघामधील भविष्य निर्वाह निधीमध्ये सन २०१९ ते २०२१ या कालावधीमध्ये गैरव्यवहार झाला असून भविष्य निर्वाह निधी विभागाचे वरिष्ठ सामाजिक सुरक्षा अधिकारी व डेअरीमधील दोन कर्मचाऱ्यांनी भविष्य निर्वाह निधी विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत संगनमत करुन एकूण ६७ प्रकरणांत २ कोटी २९ लाख रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याची बाब दिनांक २४ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी भविष्य निर्वाह निधी विभागाचे वरिष्ठ सामाजिक सुरक्षा अधिकारी व तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघाचे दोन अधिकारी या तिघांविरुध्द सीबीआयकडे दिनांक २४ एप्रिल, २०२५ रोजी तक्रार केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने सीबीआय स्तरावर गैरव्यवहार करणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे. सदरचे प्रकरण हे भविष्य निर्वाह निधी कार्यालय, श्रम व रोजगार मंत्रालय, भारत सरकार या विभागाशी संबंधित आहे. यास्तव सदर प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय), भ्रष्टाचार विरोधी शाखा (एसीबी), मुंबई यांच्याकडे दिनांक १८/०३/२०२५ रोजी FIR दाखल केलेला आहे. याबाबतचा पुढील तपास सीबीआय मार्फत चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परदेशवाडी तलावात (जि.छत्रपती संभाजीनगर) रसायनयुक्त पाणी प्रकियेविना सोडण्यात येत असल्याबाबत

**(१४) * २४३७ श्री.अंबादास दानवे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जोगेश्वरी (ता.वाळूज, जि.छत्रपती संभाजीनगर) भागातील परदेशवाडी तलावाच्या पाण्याचे शासनाच्या विविध विभागाने घेतलेल्या नमुन्यांमध्ये सदर पाणी सिंचनासाठी व पिण्याच्या वापरासाठी योग्य नसल्याचा अहवाल शासनास दिला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाळूज औद्योगिक परिसरातील उद्योजक व कारखान्यांकडून कोणतीही प्रक्रिया न करता रसायनयुक्त पाणी परदेशवाडी तलावामध्ये सोडण्यात येत असून दूषित पाण्यामुळे भूगर्भातील जलस्त्रोत्र खराब होवून दूषित पाण्याचा वापर केल्याने नागरिकांमध्ये त्वचा विकार, किडनीचे आजार, पोटाचे विकार, कॅन्सर, डोळयांचे आजार इत्यादी आजारांचे प्रमाण वाढले असून शेतीचे उत्पादन सुध्दा कमी झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परदेशवाडी तलावाच्या दूषित पाण्यामुळे जागेश्वरी, रामराई, कमळापूर व रांजणगावातील एकूण १ लाख नागरिकांच्या पिण्याचा व शेतीच्या सिंचनाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वाळूज औद्योगिक परिसरातील उद्योजक व कारखान्यांकडून कोणतीही प्रक्रिया न करता रसायनयुक्त पाणी परदेशवाडी तलावामध्ये सोडण्यात येत असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडे करण्यात येवूनही महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून अशा उद्योजकांवर व कारखानदारांवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने परदेशवाडी तलावामध्ये रसायनयुक्त पाणी सोडणाऱ्या उद्योजक/ कारखान्यांवर व यामध्ये दोषी असलेल्या महामंडळाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन तलावाशेजारी असलेल्या गावातील नागरिकांना शेतीसाठी व पिण्यासाठी शुध्द पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२)

• महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सर्व नैसर्गिक तलावातील पाण्याचे नमुने नियमितपणे संकलित करण्यात येतात. त्यानुसार परदेशवाडी (रामराई) तलावातील पाणी शेतीसाठी वापरण्यास योग्य असल्याचे आढळून आले आहे.

• जिल्हा आरोग्य अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार मौजे जोगेश्वरी परिसरातील पिण्याच्या पाणी स्त्रोतांच्या नमुन्यांची प्रादेशिक आरोग्य प्रयोगशाळा, छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत केलेल्या तपासणीनुसार सदर पाणी पिण्यास योग्य असल्याचे आढळून आले आहे.

• जिल्हा आरोग्य अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार प्रश्नाधीन गावांमध्ये माहे एप्रिल, २०२५ किंवा त्यासुमारास जलजन्य व किटकजन्य आजाराच्या प्रमाणात वाढ झाल्याचे आढळून आले नाही.

(३)

• महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार वाळूज औद्योगिक क्षेत्राच्या परिसरातील १४ ग्रामपंचायतींना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत शुध्द पाण्याचा पुरवठा करण्यात येतो.

(४) व (५)

• वाळूज औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांचे रासायनिक सांडपाणी प्रक्रिया करण्याकरीता सामाईक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित असून सदर सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातून ५ द.ल.लि. प्रतिदिन इतक्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून प्रक्रियाकृत सांडपाणी राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्थेने निर्धारीत केलेल्या ठिकाणी सोडण्यात येते.

• वाळूज औद्योगिक परिसरातील जलस्त्रोतांच्या प्रदुषणाच्या अनुषंगाने मा.राज्य मानवी हक्क आयोगामध्ये दाखल सु-मोटो याचिकेमध्ये मा.आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्या अध्यक्षतेखाली समित गठीत करण्यात आली आहे. सदर समितीमार्फत वाळूज औद्योगिक परिसरातील जलस्त्रोतांचे प्रदूषण कमी करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या कालबध्द कृती आराखड्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

• वाळूज औद्योगिक परिसरातील प्रदुषणाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उद्योगांना वेळोवेळी भेट देऊन पाहणी करण्यात येते व पाहणी दरम्यान दोषी आढळून आलेल्या व संमतीपत्रातील अटी व शर्तींचे उल्लंघन करत असल्यास सदर उद्योगांवर नियमांनुसार वेळोवेळी आवश्यक ती कारवाई करण्यात येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंगोली बसस्थानकाच्या इमारतीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(१५) * २६८० डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या हिंगोली शहरातील बसस्थानकाच्या इमारतीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे बसस्थानकातील उपहारगृहाचे छत कोसळल्याची बाब दिनांक २४ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रवाशांना बसण्यासाठी पुरेशी जागा नसणे, दारे-खिडक्यांची दुरवस्था झाली असून आवाराचे काम निकृष्ट केल्यामुळे गिट्टी उखळली असून तेथे खड्डे पडले आहेत, सदर बसस्थानकाच्या नविन बांधण्यात आलेल्या इमारतीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याच्या तक्रारी प्रवाशांकडून केल्या जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील बसस्थानकाच्या इमारतीच्या कामांची चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच प्रवाशांना उत्तम सुविधा देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१), (२), (३) व (४) उपहारगृहाच्या छताचे प्लास्टर (सुमारे १ चौ.मी.) पडले असल्याने पुन्हा नव्याने प्लास्टर करण्यात येत आहे. प्रवाशांना बसण्यासाठी बांधकामात पुरेशी आसनव्यवस्था करण्यात आलेली असून ती सुस्थितीत आहेत. इमारतीचे दरवाजा खिडक्या सुस्थितीत आहेत. बसस्थानकाच्या वाहनतळास डांबरीकरण (एमपीएम) करण्याचे काम सन २०२२ मध्ये करण्यात आलेले असून, किरकोळ दुरुस्तीचे कामे करण्यात येत आहेत.

-----------------

## अहिल्यानगर जिल्ह्यातील धर्मवीर गडाचे संवर्धन करण्याबाबत

**(१६)** * **२२८८ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहिल्यानगर जिल्ह्यातील धर्मवीर गडावर छत्रपती शिवरायांचे वास्तव्य होते, त्यामुळे सदर गडास ऐतिहासिक वारसा असूनही त्याचा समावेश राज्य शासनाच्या गड संवर्धन योजनेत करण्यात आलेला नाही. सदर गड संवर्धन योजनेत प्रसिध्द ठिकाणांना प्राधान्य दिले जात असल्यामुळे स्थानिक तरुणांनी श्रमदानातून गड संवर्धनाच्या उपक्रमांना सुरुवात केली आहे तसेच शासनाच्या दुर्लक्षामुळे ऐतिहासिक गडाच्या मूळ रचनेत बदल होण्याची शक्यता निर्माण झाली असून त्यामुळे धर्मवीर गडाची दुरवस्था झाले असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गडाचा संवर्धन योजनेत समावेश करण्याबाबत व धर्मवीर गडाच्या संवर्धनासाठी निधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) नाही.

सद्य:स्थितीत स्थानिक नागरिक सदर ठिकाणी श्रमदानातून गड संवर्धन करत असून याकरीता संचालनालयाकडून सदर कामास पुरातत्त्वीय संकेतावलीनुसार तसेच “महाराष्ट्र प्राचीन स्मारके, पुराणवास्तुशास्त्र विषयक स्थळे अवशेष व अधिनियम १९६० व नियम १९६२ यातील तरतुदी व १५/०९/१९८२ च्या परिपत्रकातील अटी व शर्तीच्या अधिन राहुन संस्थांना सदर कामांसाठी ना-हरकत

प्रमाणपत्र देण्यात येते. मूळ संरचनेत बदल होणार नाही, याची संचालनालयाकडून योग्य ती खबरदारी घेण्यात येते.

(२) सदर असंरक्षित स्मारकाचे सध्या संवर्धन करण्याच्या दृष्टीने दिनांक ०९/०६/२०२५ रोजीच्या जिल्हा नियोजन समिती, जि.अहिल्यानगर यांच्या पत्रानुसार धर्मवीर गड, पेडगाव, ता.श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर या असंरक्षित स्मारकाचा स्थळ व्यवस्थापन आराखडा बनविण्याची तसेच सदर गडास संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याची कार्यवाही संचालनालय स्तरावर सुरू आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## अकोला, वाशिम, बुलढाणा धर्मादाय आयुक्त कार्यालयातील ऑनलाईन सिस्टीम बंद राहत असल्याबाबत

**(१७) * ३२४५ श्री.वसंत खंडेलवाल, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-(१) अकोला, वाशिम, बुलढाणा धर्मादाय आयुक्त कार्यालयातील ऑनलाईन सिस्टीम नेहमीच बंद राहत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विभागाचे काम बंद असलेल्या ऑनलाईन सिस्टीम मुळे प्रभावित होत असून संबंधित जनतेची कामे होत नसल्याने अधिकाऱ्यांच्या निष्क्रीयतेमुळे जनतेला नाहक मनस्ताप होत असल्यामुळे सदर ऑनलाईन सिस्टीम व्यवस्थित व निरंतर चालू ठेवण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.

(२) सदर विभागाचे काम बंद ऑनलाईन सिस्टीममुळे प्रभावित होत आहे ही वस्तुस्थिती आहे. तथापि, सदर बाब संबंधित अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे घडली ही वस्तुस्थिती नाही.

धर्मादाय संघटनेच्या संकेतस्थळाच्या (http://charity.Maharashtra.gov.in) देखभाल दुरुस्ती व व्यवस्थापनाचे काम मे. महाआयटी या कंपनी मार्फत केले जाते. धर्मादाय संघटनेच्या संकेस्थळावरील संपूर्ण माहिती ही स्टेट डेटा सेंटर (SDC) मार्फत संचलित सर्व्हरवर संकलित व जतन केली जात असून, दरमहा सरासरी ४००-५०० जीबी एवढ्या क्षमतेची आवश्यकता भासते. संकेतस्थळावर अधिकचा स्पेस उपलब्ध होऊ न शकल्याने, तांत्रिक कारणास्तव संकेतस्थळ बंद पडले. तथापि, सध्या SDC ने १५ TB स्पेस उपलब्ध करुन दिली आहे.

धर्मादाय संघटनेच्या संकेतस्थळाचे व्यवस्थापन करणाऱ्या Maha IT या कंपनीकडून क्लाऊड सेवा घेण्याच्या प्रस्तावास शासन ज्ञापन क्र.सीएचसी २०२४/प्र.क्र.१८/२४/का-१७, दिनांक २०/१२/२०२४ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. तथापि, सध्या NICSI या संस्थेचा मान्यताप्राप्त Tier-१ दर्जाचा नवीन सेवापुरवठादार नियुक्त करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर असून, त्याकरीता तांत्रिक प्रस्ताव प्राप्त झाला असून, आर्थिक प्रस्ताव प्राप्त होताच शासन स्तरावर निर्णय घेवून, धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे संकेतस्थळ पूर्णत: नवीन व आधुनिक स्वरुपात कार्यान्वित करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आरे वसाहतीतील जमिनीचे संरक्षण करण्याबाबत

**(१८) * ३३७९ श्री.राजहंस सिंह, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-(१) मुंबईतील पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील असलेल्या आरे वसाहतीस मोठ्या प्रमाणात आगी लागत असून तेथे मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होऊन अनेक अनधिकृत बांधकामे होत असतानाही आरे दुग्ध वसाहतीच्या हजारो एकर जागेचे रक्षण एक सुरक्षा अधिकारी व ४५ कामगार करित असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरे वसाहतीतील सुरक्षा व्यवस्था वाढविण्याच्या दृष्टीने तसेच हजारो एकर जमिनीचे संरक्षण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) आरे दुग्ध वसाहतीत मोठ्या प्रमाणात आगी लागल्याची अथवा मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत असल्याची बाब सद्य:स्थितीत निदर्शनास आलेली नाही.

आरे वसाहतीतील जागेचे संरक्षण करणे व अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करणे याकरीता एक सुरक्षा अधिकारी व ५८ सुरक्षा रक्षक कार्यरत आहेत.
(२) आरे दुग्ध वसाहतीमधील जमिनीचे संरक्षण करणे व अतिक्रमण निष्कासन करीता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचे खाजगी सुरक्षा रक्षक घेण्याकरीता कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच रात्र व दिवस गस्त घालणे, याकरीता वाहन भाडेतत्वावर घेण्यात आलेले आहे.

आवश्यकतेनुसार स्थानिक पोलीस प्रशासन व बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे समन्वयाने अतिक्रमण निष्कासन कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## मुंब्रा (जि.ठाणे) येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीत अल्पवयीन मुलीची हत्या झाल्याबाबत

**(१९) * ३५०३ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंब्रा (जि.ठाणे) पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या सम्राटनगर परिसरात श्रद्धाप्राप्ती इमारतीमध्ये एका दहा वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार करुन क्रूर हत्या केल्याची तसेच कळवा येथील रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शवविच्छेदनाच्या अहवालामध्ये मृत अल्पवयीन मुलीच्या शरीरावर वार केल्याचे नमूद केले असून सदर पिडीत मुलीला सहाव्या मजल्यावरील खिडकीतून फेकून दिले असल्याचे बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने सदर गुन्ह्यातील दोषींविरुध्द गुन्हा दाखल करून आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची कारवाई करण्याबाबत व पिडितेच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे,

सदर प्रकरणी मुंब्रा पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे गु.र.नं.५७७/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१), ९६, १३७ (२), ६४, ६५ (२), ६४ (आय), २३८ सह बालकांचे लैंगिक अत्याचार प्रतिबंध अधिनियम सन २०१२ चे कलम ४, ६, ८, १२ अन्वये दिनांक ०८/०४/२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

वैद्यकीय अधिकारी यांनी “Haemorrhage and Shock due to stab jnjury over neck causing injury to vital structures with evidence of sexual assault” असा अहवाल दिला आहे.

(२) सदर गुन्ह्यातील आरोपीस दिनांक ०८/०४/२०२५ रोजी अटक करण्यात आली असून त्याच्याविरुध्द दिनांक ३०/०५/२०२५ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. आरोपी न्यायालयीन कोठडीमध्ये आहे.

पीडित मुलीच्या कुटुंबियांना मनोधैर्य योजनेंतर्गत रुपये ५,००,०००/- इतके अर्थ सहाय्य मंजूर करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माहूर (जि.नांदेड) गडावरील उद्वाहन, स्कायवॉकसह विविध प्रस्तावित विकासकामे प्रलंबित असल्याबाबत

**(२०) * २८८३ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी एक पूर्ण पीठ असलेल्या तीर्थक्षेत्र माहूरचा विकास राज्यातील इतर तीर्थक्षेत्राच्या तुलनेत नगण्य असून माहूर गडावरील उद्वाहन, स्कायवॉकसह इतर विविध प्रस्तावित विकासकामे गत काही दिवसांपासून प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहुर गडावरील प्रस्तावित प्रलंबित कामे तातडीने सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) हे खरे नाही.

पुरातत्व संचालनालयाच्या अधीन असलेल्या नांदेड विभागीय कार्यालयाकडून रेणुकादेवी मंदिराची जत्तन वा संवर्धनाची कामे यापूर्वीच करण्यात आलेली आहेत.

सन २०१५ ते २०२० मध्ये माहूर किल्ला (जि.नांदेड) येथील जतन कार्यासाठी रु ५.७१ कोटी इतका खर्च शासनाकडून करण्यात आला आहे.

श्री क्षेत्र माहूर, जि.नांदेड येथील रेणुकादेवी मंदिरात जाण्याकरीता भाविकांच्या सोयीसाठी उद्वाहक व स्कायवॉकची कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत हाती घेण्यात आले आहे. यासाठी पुरातत्व संचालनालयाच्या विभागीय कार्यालय, नांदेड यांच्याकडून जा.क्र. स्मारके/ जतन/२०२३/२०३ दिनांक ०६/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सदर कामासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उल्हासनगर येथील तीन डॉक्टरांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये गैरव्यवहार केल्याबाबत

**(२१) * २३७४ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर येथील तीन डॉक्टरांनी बनावट कागदपत्रे आणि रुग्णनोंदी तयार करून ४ लाख ७५ हजार रुपयांचा मुख्यमंत्री सहायता निधीचा गैरवापर केल्याचा प्रकार दिनांक २० एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आला असून याप्रकरणी मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे प्रभारी सहसंचालक यांच्यामार्फत खडकपाडा, (ता.कल्याण) पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व चौकशीच्या अनुषंगाने अशा प्रकारची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदर प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) आणि (२) होय, हे अंशत: खरे आहे.

गणपती मल्टीस्पेशालीटी हॉस्पिटल, आंबिवली (पूर्व), जि.ठाणे येथील एक डॉक्टर व इतर ०२ डॉक्टर नसलेल्या व्यक्तींनी संगनमत करून प्रत्यक्षात १३ रुग्ण शस्त्रक्रिया व औषधोपचारासाठी सदर हॉस्पिटलमध्ये दाखल नसताना, बनावट कागदपत्रांआधारे शस्त्रक्रिया झाल्याचे व औषधोपचार घेतल्याचे दाखवून मुख्यमंत्री सहायता निधी, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून बनावट कागदपत्रांच्या आधारे रुपये ४ लाख ७५ हजार इतकी रक्कम सदर हॉस्पिटलच्या बँक खात्यात प्राप्त करून घेऊन शासनाची फसवणूक केली आहे. याबाबत प्रभारी सहायक संचालक, मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन खडकपाडा पोलीस ठाणे, कल्याण, ठाणे शहर येथे दिनांक १७/०४/२०२५ रोजी गुन्हा रजि.नंबर ३२४/२०२५ मध्ये भारतीय दंड संहिता १८६० मधील कलम ४२०, ४०६, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे. अशा प्रकारची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या नामिकासूचीवरुन गणपती मल्टीस्पेशालीटी हॉस्पिटल, आंबिवली (पूर्व), जि.ठाणे या रुग्णालयाची नोंद कमी करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात केलेली रक्कम भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळामध्ये जमा केली नसल्याबाबत

**(२२) * २८१० ॲड.अनिल परब, श्री.शशिकांत शिंदे, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ : तारांकित प्रश्न क्रमांक २०६ ला दिनांक १२ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळातील ८७ हजार कर्मचारी व अधिकारी यांच्या पगारातून कपात केलेली रुपये १,२४० कोटींची रक्कम एसटी महामंडळाने भविष्य निर्वाह निधी (पीएफ) ट्रस्टमध्ये भरली नसल्याने गुंतवणूकीवरील रुपये १०० कोटींची व्याजाची रक्कम बुडल्याची माहिती एसटी कर्मचारी संघटनेच्या सरचिटणीसांनी दिली असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एसटी कर्मचाऱ्यांची रुपये १२४० कोटींची रक्कम पीएफ ट्रस्टमध्ये न भरण्याची कारणे काय आहेत, तसेच, एसटी कर्मचाऱ्यांना सन २०१८ पासूनचा महागाई भत्ता मिळाला नसल्याने कर्मचारी नाराज आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, माहे मार्च, २०२५ अखेर एसटी कामगारांच्या वेतनातून कपात करून घेतलेली सुमारे रुपये ११८६ कोटींची अंशदानाची रक्कम महामंडळाकडे थकीत असल्याचे निदर्शनास आले असून कामगारांना गेल्या ६ महिन्यांपासून भविष्य निर्वाह निधीतून अग्रिम मंजूर करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सवलतमुल्याच्या प्रतिपुर्तीपोटी मिळण्याऱ्या निधीमधून रा.प कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्यास प्राप्त निधी पुरेसा नसल्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांचे/अधिकाऱ्यांचे पीएफ आणि ग्रॅज्युएटीची रक्कम, भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळास व उपदान निधी विश्वस्त मंडळास अदा करण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे तसेच कामगारांच्या वेतनातील वैधानिक वजावटीची रक्कम अन्यत्र गुंतविली जात असून या आर्थिक गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्या लेखा खात्यातील अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करुन एसटी कर्मचाऱ्यांचे रुपये १०० कोटींचे व्याज भरुन काढण्याचे दृष्टीने व एसटी महामंडळास आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळास रा.प महामंडळाकडून वेळोवळी निधी वर्ग न झाल्याने गुंतवणूक करता आलेली नाही. त्यामुळे भ.नि.नि विश्वस्त मंडळास त्यावरील व्याजाचे उत्पन्न मिळालेले नाही.
(२) निधीची कमतरता असल्यामुळे भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळास रक्कम वर्ग करणे प्रलंबित आहे. त्रिसदस्यीय समितीच्या अहवालानुसार महागाई भत्त्याच्या प्रलंबित थकबाकीबाबत महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारल्यानंतर रा.प महामंडळाच्या स्तरावर योग्य तो निर्णय घेण्यात येणार आहे.
(३) रा.प.कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधीतून माहे एप्रिल २०२५ पर्यंतचे भ.नि.नि अग्रिम प्रदान करण्यात आलेले आहेत.
(४) माहे एप्रिल-२०२५ अखरेची सद्य:स्थिती

| | | |
|---|---|---|
| | | (प्रलंबित रक्कम) |
| १. | भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळ | - रुपये १२७०.७२ कोटी |
| २. | उपदान निधी विश्वस्त मंडळ | - रुपये १२३४.१९ कोटी |

३. कर्मचारी ठेव विमा निगडीत - रुपये २२.२४ कोटी

योजना विश्वस्त मंडळ

कामगारांच्या वेतनातील वैधानिक वजावटीची रक्कम अन्यत्र गुंतविलेली नाही.

(५) शासनामार्फत रा.प. महामंडळास सवलत मुल्याची प्रतिपुर्ती करण्यात येते.

-----------------

## राज्यातील युवकांच्या आत्महत्येत अंमली पदार्थ सेवनामुळे वाढ झाल्याबाबत

**(२३) * २७७२ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोविड-१९ नंतर युवक अंमली पदार्थ सेवनाच्या आहारी जात असल्याने त्यांचा मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर परिणाम निर्माण होत असून नाशिक जिल्ह्यातील घोटी येथील जनता विद्यालयातील एका विद्यार्थ्याच्या दप्तरात गांजा, गुटखा, चाकू इ. पदार्थ आढळल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२१ मध्ये नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्युरो (NCRB) यांच्या आकडेवारीनुसार भारतात ड्रग्ज आणि अल्कोहोलच्या व्यसनामुळे १०,५६० व राज्यात शेकडो लोकांनी अंमली पदार्थांच्या सेवन/व्यसनामुळे आत्महत्या केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गुटखाबंदी असतानाही विमलसारख्या गुटख्याच्या अनेक जाहिराती टी.व्ही.च्या माध्यमातुन विविध वाहिन्यांवर प्रदर्शित करण्यात येतात यामध्ये नामांकित क्रिकेटपट्टू व हिरो,हिरोईन्स अशा पदार्थांना उत्तेजन देतात त्यामुळे युवा पिढी या सेवनाच्या आहारी जाऊन आपले जीवन उध्दवस्त करित असल्याने अंमली पदार्थांच्या सेवनावर शासनाने निर्बंध आणून त्यासंदर्भात कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) नाशिक ग्रामीण घटकातील घोटी पोलीस ठाण्यात सदर घटनेबाबत कोणतीही तक्रार अथवा गुन्हा दाखल नाही.

(२) सन २०२१ मध्ये नॅशनल क्राइम रेकॉर्डस ब्युरो (NCRB) च्या अहवालानुसार राज्यात अंमली पदार्थाच्या सेवन/ अल्कोहोलच्या व्यसनामुळे २८१८ लोकांनी आत्महत्या केल्या आहेत.

(३) राज्यात प्रतिबंधीत गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ तसेच इतर अंमली पदार्थावर बंदी असतानाही अनेक पानटपऱ्या व स्टॉलवर होत असलेल्या विक्रीच्या अनुषंगाने पोलीस विभागाद्वारे सिगारेट व तंबाखूजन्य उत्पादने (जाहिरात, प्रतिबंध व व्यापार वाणिज्य, उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) कायदा २००३ च्या कलम ४,५,६अ,६ब व ७ अन्वये राज्यात जानेवारी ते एप्रिल २०२५ या कालावधीत ३७,१४९ व्यक्तींवर कारवाई करण्यात आली असून त्यामध्ये एकूण रुपये ४४,४०,७५३/- इतक्या किंमतीचा दंड वसूल करण्यात आला आहे.

पोलीस महासंचालक कार्यालयाच्या दिनांक ६/१०/२०१० च्या परिपत्रकान्वये संपूर्ण महाराष्ट्रात अवैध दारु विक्री निर्मिती/गुटखा बंदी बाबत आवश्यक ती प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने तसेच दिनांक ३/१२/२०२१ च्या परिपत्रकान्वये गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखू / सुगंधित सुपारी,

खरा, मावा या प्रतिबंधीत अन्न पदार्थांच्या बंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने सर्व पोलीस घटक प्रमुखांना आवश्यक त्या सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस महासंचालक कार्यालयाच्या दिनांक ३१/०३/२०२२ च्या परिपत्रकान्वये विदेशी सिगारेट व तंबाखुच्या पाकीटांवर सचित्र वैधानिक इशारा नसलेल्या बेकायदेशीर उत्पादनांच्या विक्रीवर/ तस्करीवर कारवाई करण्याबाबत सर्व पोलीस घटक प्रमुखांना आवश्यक त्या सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

तसेच राज्यात अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्यांविरुध्द/ जवळ बाळगणाऱ्यांविरुध्द/ सेवनार्थीं विरुध्द एनडीपीएस कायदा १९८५ अन्वये कारवाई करण्यात येते. राज्यात सन २०२४ ते मार्च २०२५ पर्यंत अंमली पदार्थ कायद्यांतर्गत सेवनार्थींच्या विरुध्द १९२०६ गुन्हे दाखल असून १६९०५ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे तसेच अंमली पदार्थ ताब्यात बाळगणे/वाहतूक करणे संदर्भात एकूण ३५२१ गुन्हे दाखल झालेले असून ४७६५ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे व एकूण रुपये ४३३८.९० कोटी किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेले आहेत.
अंमली पदार्थ तस्करी तसेच विक्रीवर आळा घालण्यासाठी शासन खालीलप्रमाणे उपाययोजना करते.

● राज्यात अंमली पदार्थ तस्करांविरुध्द विशेष मोहीमा, ड्रग्ज मुक्त अभियान, शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती कार्यक्रम तसेच वाहन रॅली व पथनाट्ये आयोजनाद्वारे अंमली पदार्थ सेवन व विक्री न करण्याबाबत जनजागृती करण्यात येते.

● राज्यात अंमली पदार्थाच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकामध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केलेले आहेत.

● केंद्र शासनाच्या दि २५/०३/२०२२ च्या आदेशान्वये नार्कोकोऑर्डीनेशन यंत्रणेची पुनर्रचना करण्यात आली असून त्यानुसार दिनांक ३१/०८/२०२३ च्या शासन निर्णयाने अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) ची स्थापना करण्यात आली आहे. शासन निर्णय दिनांक ०६/०८/२०२४ अन्वये अंमली पदार्थ टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राज्यासाठी NCORD (Narco-Coordination centre) सचिवालय म्हणून व विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) यांची राज्यस्तरीय नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स करीता दिनांक १९/०३/२०२५ रोजीच्या शासन निर्णय क्र एपीओ-३१२३/प्र.क्र.८२/पोल-३ अन्वये एकूण ३४६ पदे नव्याने निर्माण करण्यात आली आहेत.

● अंमली पदार्थावर आळा घालण्यासाठी राज्यस्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समिती व जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समितीची स्थापना करण्यात आली असून सदर समित्यांकडून अंमली पदार्थावर आळा घालण्याबाबत वेळोवेळी आढावा घेतला जातो.

● दरवर्षी २६ जून रोजी जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन साजरा केला जातो. या वर्षी दिनांक १२ जून, २०२५ ते २६ जून, २०२५ या कालावधी दरम्यान राज्यात अंमली पदार्थ विरोधी पंधरवडा अभियान राबविण्यात येत आहे सदर कालावधीत अंमली पदार्थ विरोधी कक्ष, स्थानिक पोलीस ठाणे तसेच अशासकीय संस्था मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळा, महाविद्यालय, रेल्वे स्थानक, महत्वाचे

चौकांमध्ये अंमली पदार्थ विरोधी पोस्टर्स, बॅनर्स तसेच पथनाट्यद्वारे जनजागृती केली जाते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोईसर (जि.पालघर) येथील एमआयडीसी परिसरात रासायनिक प्रदूषित सांडपाण्यामुळे भूगर्भातील पाणी प्रदूषित झाल्याबाबत

**(२४) * २३६९ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर (जि.पालघर) येथील एमआयडीसी परिसरात रासायनिक कारखान्यांतून प्रक्रियेविना अनधिकृतपणे नाल्यात सोडण्यात येणाऱ्या रासायनिक प्रदूषित सांडपाण्यामुळे भूगर्भातील पाणी प्रदूषित झाले असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्हा परिषदेद्वारे सन २०२१ मध्ये केलेल्या पाणी परिक्षणामध्ये येथील पाणी पिण्यास अयोग्य असल्याने ग्रामस्थांना विकतच्या पाणी पुरवठ्यावर अवलंबून राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व एमआयडीसी यांनी जलप्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना अंमलात आणल्या नसल्याने तसेच बेधडकपणे रसायने सोडणाऱ्यांविरुध्द कारवाई न केल्याने एमआयडीसी परिसराच्या भूगर्भातील पाणी रसायनयुक्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रासायनिक सांडपाणी सोडणाऱ्या कंपन्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

• महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास जिल्हा परिषद, पालघर यांच्याकडून प्राप्त दिनांक २२/१०/२०२० च्या अहवालानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ तारापूर व बोईसर वसाहतीतंर्गत करण्यात आलेल्या रासायनिक तपासणी दरम्यान ८८ नमुन्यांपैकी ५ पाणी नमुने व जैविक तपासणी दरम्यान ८६ नमुन्यांपैकी ८ पाणी नमुने दूषित असल्याचे आढळून आले होते. तसेच एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ दरम्यान पाणी साठ्याच्या ३७८ नमुन्यांच्या करण्यात आलेल्या तपासणीमध्ये ६ पाणी नमुने पिण्यास अयोग्य असल्याचे आढळून आले आहे.

• सध्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, तारापूर, बोईसर वसाहतीलगतच्या गावातील नागरीकांना पिण्याच्या पाण्याचा पाणीपुरवठा अति सवलतीच्या दराने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे करण्यात येतो.

(३) व (४)

• दूषित पाणी आढळून आलेल्या स्त्रोतांवर पाणी पिण्यास अयोग्य असल्याचे फ़लक संबंधित ग्रामपंचायतीमार्फ़त लावण्यात आले आहेत.

• बोईसर औद्योगिक परिसरातील प्रदुषणाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उद्योगांना वेळोवेळी भेट देऊन पाहणी करण्यात येते व पाहणी दरम्यान दोषी आढळून आलेल्या व संमतीपत्रातील अटी व शर्तीचे उल्लंघन करत असल्यास सदर

उद्योगांवर नियमांनुसार वेळोवेळी आवश्यक ती कारवाई करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे परीक्षा पुढे ढकलण्याची ईडब्ल्यूएस आणि एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी मागणी केल्याबाबत

**(२५) * २८४१ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.वसंत खंडेलवाल, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने ईडब्ल्यूएस आणि एसईबीसी आरक्षणानुसार मुख्य परीक्षेस पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना अर्ज करण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा याकरीता आणि परीक्षा १५ दिवस पुढे घेण्यासाठी स्पर्धा परीक्षाधारक विद्यार्थ्यांनी पुण्यात झालेल्या पत्रकार परिषदेत मागणी केली असल्याची बाब माहे एप्रिल २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यभरातून मुख्य परीक्षेला ७ हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी पात्र ठरले होते, परंतु २ हजार विद्यार्थ्यांच्या आरक्षणातील त्रुटींमुळे अर्ज स्वीकारले गेले नसून विद्यार्थ्यांना प्रवर्ग बदलण्यासाठी लिंक उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी विद्यार्थ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी आरक्षणाच्या गोंधळामुळे विद्यार्थी एमपीएससी परीक्षेपासून वंचित राहू नये याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) काही उमेदवारांनी अर्ज सादर करण्यास पुरेसा वेळ द्यावा तसेच परीक्षा पुढे ढकलण्याची आयोगास मागणी केली होती. त्यानुसार आयोगाने राज्य सेवा (पूर्व), परीक्षा-२०२४ च्या सुधारित निकालानुसार नव्याने मुख्य परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षेसाठी अर्ज सादर करण्यास मुदतवाढ दिली.
(२) राज्य सेवा मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या ७९७० उमेदवारांपैकी ७८२३ उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केले आहेत. सबब, उमेदवार मुख्य परीक्षेसाठी अर्ज भरु शकले नाहीत अशी वस्तुस्थिती नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धर्मादाय रुग्णालयांना देण्यात येणाऱ्या सवलतीचा योग्य वापर होत नसलेबाबत

**(२६) * २६२७ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धर्मादाय रुग्णालयाला शासनाकडून विविध सवलती दिल्यानंतरही रुग्णालयांमध्ये गरीब आणि गरजू रुग्णांना मोफत किंवा सवलतीच्या दरात उपचार मिळत नसल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धर्मादाय रुग्णालयांना नाममात्र दराने शासकीय जमिनी/जागेमध्ये, भाड्यामध्ये सवलत, वीज व पाणी बिलात सवलत, आयकर, महापालिकेमध्ये कर सवलत, देणग्यांवर कर सवलत इत्यादी सवलती मिळतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, धर्मादाय रूग्णालयांना उक्त सवलती मिळून सुद्धा गरीब आणि गरजू रुग्णांना उपचाराअभावी आपला जीव गमवावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, धर्मादाय रुग्णालयांमार्फत गरीब व गरजू रुग्णांना उपचार मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) दिनानाथ मंगेशकर धर्मादाय रुग्णालयात प्रसुतीकरीता आलेल्या श्रीमती ईश्वरी (तनिषा) भिसे या महिलेस १० लक्ष रुपये अनामत रक्कम भरणे शक्य न झाल्याने सदर महिलेवर वेळेत उपचार न केल्यामुळे प्रसुतीनंतर मृत्यू झाल्याची बाब निदर्शनास आल्यामुळे धर्मादाय सह आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर प्रकरणी रुग्णाच्या नातवाईकांनी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० मधील तरतूदीनुसार तसेच मा.उच्च न्यायालयाने मंजूर केलेल्या धर्मादाय योजनेंतर्गत निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठीच्या उपचारासाठी कोणतेही कागदपत्र दाखल केल्याचे दिसून आले नाही. याव्यतिरिक्त इतर तक्रारी माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आल्या नाहीत.
(२) अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र राज्यात एकूण ४६२ धर्मादाय रुग्णालये आहेत. त्यापैकी ९४ धर्मादाय रुग्णालयांना सरकारी भुखंड मोफत, नाममात्र भाडेतत्वावर किवा सवलतीच्या दरात मिळालेला आहे. नाशिक येथील एका रुग्णालयास महानगरपालिकेची कर सवलत मिळत आहे. धर्मादाय कार्यालयात नोंदणीकृत असलेल्या सर्वच न्यासांना आयकर कायद्यातील नियमाप्रमाणे काही सूट मिळते. न्यासातर्फे धर्मादाय रुग्णालये चालवत असल्यास त्याबद्दल धर्मादाय रुग्णालयांना वेगळी आयकर सूट मिळत नाही. धर्मादाय रुग्णालयांना वीज व पाणी बिलात सवलत दिल्याचे दिसून येत नाही.
(३) दिनानाथ मंगेशकर धर्मादाय रुग्णालयात प्रसुतीकरीता आलेल्या श्रीमती ईश्वरी (तनिषा) भिसे या महिलेस १० लक्ष रुपये अनामत रक्कम भरणे शक्य न झाल्याने सदर महिलेवर वेळेत उपचार न केल्यामुळे प्रसुतीनंतर मृत्यू झाल्याची बाब निदर्शनास आली होती. सदर प्रकरणी रुग्णाच्या नातेवाईकांनी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० मधील तरतूदीनुसार तसेच मा.उच्च न्यायालयाने मंजूर केलेल्या धर्मादाय योजनेंतर्गत निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठीच्या उपचारासाठी कोणतेही कागदपत्र दाखल केल्याचे दिसून आले नाही.
(४) गरीब व निर्धन लोकांना धर्मादाय रुग्णालयात उपचार मिळणेकरीता व सदर रुग्णालयांवर योग्य ते नियंत्रण ठेवण्याकरीता मा.मुख्यमंत्री तथा मंत्री (विधि व न्याय) महोदयांच्या कार्यालयाच्या अधिनस्त धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष स्थापन करण्यात आला असून निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांकरीता राखीव खाटांचे वाटप प्रभावी व पारदर्शी पध्दतीने व्हावे या करीता विधि व न्याय विभागामार्फत एक ऑनलाईन प्रणाली विकसित केली आहे.

विधि व न्याय विभागाने दिनांक २१/०४/२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. सदर शासन निर्णयानुसार धर्मादाय रुग्णालयांनी निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी असलेल्या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी कराची अशा सूचना सर्व धर्मादाय रुग्णालयांना देण्यात आल्या आहेत. तसेच, धर्मादाय रुग्णालयाने कोणत्याही रुग्णाकडून अवाजवी पध्दतीने अनामत रक्कम स्विकारू नये व अनामत रकमे अभावी कुठल्याही रुग्णास उपचार नाकारले जाणार नाहीत, याची दक्षता घेण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच सर्व धर्मादाय रुग्णालयांना निर्धन रुग्ण निधी तसेच निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी विवक्षित खाटांची माहिती धर्मादाय आयुक्त व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष यांच्या संकेतस्थळावर अद्ययावत करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच विधि व न्याय विभागाने दिनांक १०/०६/२०२५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्याप्रमाणे धर्मादाय रुग्णालयांमध्ये १८६ धर्मादाय आरोग्य सेवकांच्या सेवा बाह्ययंत्रणेद्वारे घेण्याबाबत निविदा सूचना (Tender Notice) GeM Portal वर प्रसिध्द केलेली आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात हुंडा प्रतिबंधक कायद्याच्या अंमलबजावणीबाबत

**(२७) * ३९८९ डॉ.प्रज्ञा सातव, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १९६१ साली हुंडा प्रतिबंधक कायदा अस्तित्वात आला असतानाही महिलांवरील हुंड्यासाठी होणाऱ्या छळाच्या आणि मृत्यूच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून दरवर्षी पावणे दोनशे विवाहितांचा हुंडाबळी जात असून विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालयातील महिला व बाल अपराध प्रतिबंध विभागाच्या आकडेवारीनुसार मागील तीन वर्षात पतीकडून क्रुर वागणूक मिळाल्याचे किमान ३३ हजार गुन्हे नोंदविले असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील तीन वर्षात ३८९ इतके हुंडाबळीचे गुन्हे नोंदवले गेले असून अशा घटनांना अटकाव करण्यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष चौकशी पथक, जलद न्यायालय आणि पीडित महिलांच्या पुनर्वसनासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात १९६१ मध्ये अंमलात आलेल्या "हुंडा प्रतिबंधक कायद्या" चा धाक उरलेला नसल्याचे वैष्णवी हगवणे प्रकरणातून निष्पन्न झाले असून, मागील ३ वर्षांत नोंदविलेली हुंडाबळी व छळाच्या किती प्रकरणांवर कारवाई करण्यात आली व यासंदर्भात शासनाने हुंडाविरोधात जनजागृतीची मोहीम हाती घेवून व सदरील कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) पतीकडून क्रुर वागणूक मिळाल्याबाबत (भारतीय न्याय संहिता, कलम ८५) राज्यात दाखल गुन्ह्यांची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | दाखल गुन्हे | दोषारोप पत्र पाठविलेल्या गुन्ह्यांची संख्या |
|---|---|---|
| २०२२ | ११३६७ | १०७६९ |
| २०२३ | ११२२६ | १११५८ |
| २०२४ | १०५३९ | १०४२८ |

(२) व (३) राज्यातील हुंडाबळीची (भारतीय न्याय संहिता, कलम ८०) आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | दाखल गुन्हे | दोषारोप पत्र पाठविलेल्या गुन्ह्यांची संख्या |
|---|---|---|
| २०२२ | १८० | १७१ |
| २०२३ | १७० | १६७ |
| २०२४ | १३९ | १३५ |

दिनांक १२/१०/२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार, महिलांवरील अत्याचार, गुन्ह्यासंदर्भात जिल्हा स्तरावर तपास पथक गठीत करण्यात आले आहेत.

महिलांवर होणाऱ्या कौटुंबिक हिंसाचाराचे गांभीर्य ओळखून, पीडीत महिलेला असलेले माहिती व सेवा मिळविण्याबाबतचे हक्क याबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेद्वारे दिनांक २८/११/२०२४ रोजी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

महिलांवर होणाऱ्या अत्याचारासंदर्भात दाखल होणाऱ्या गुन्ह्यांच्या कारणांवर उपाययोजना करणे तसेच कौटुंबिक हिंसाचार प्रकरणामध्ये केस दाखल होण्यापूर्वी संबंधितांचे समुपदेशन करण्यास मदत करणे याकरीता जिल्हा / आयुक्तालय पातळीवर तसेच पोलीस स्टेशन पातळीवर महिला सुरक्षा समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

"हुंडा पध्दतीच्या विरोधात जगजागृती करण्याबाबत" जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली "जिल्हास्तरीय संनियंत्रण समिती" गठीत करण्यात आली आहे. सदर समितीची जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात येते. तसेच, वृत्तपत्र, प्रबोधन, रेडीओ, दुरदर्शन, अभ्यास शिबीर, कलापथक, सभा, प्रदर्शन याव्दारे हुंडा पध्दतीच्या विरोधात जगजागृती करण्यात येत असून त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

२६ नोव्हेंबर हा दिवस "हुंडाबंदी दिन" म्हणून साजरा करण्यात येत असून या पुढील ७ दिवस हुंडाबंदी सप्ताह म्हणून साजरा करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक प्रवासी वाहनांमध्ये पॅनिक बटण यंत्रणा बसविणेबाबत

**(२८) * २२९४ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिल्लीतील निर्भया बलात्कार घटनेनंतर महिला सुरक्षेसाठी दिनांक १ जानेवारी, २०१९ पासून सार्वजनिक प्रवासी वाहनांमध्ये पॅनिक बटण अनिवार्य करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला असून राज्य शासनाने मान्यता दिली असूनही दिनांक ३१ मार्च, २०२५ पर्यंत राज्यात अद्याप पॅनिक बटणचे कंट्रोल सेंटर उभारण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ जानेवारी, २०१९ पूर्वीच्या जुन्या सार्वजनिक प्रवासी वाहनांनासुद्धा पॅनिक बटण लावणे अनिवार्य करण्याची केंद्र शासनाची सूचना असतानाही राज्य शासनाने यासंदर्भातील धोरण निश्चित केलेले नाही तसेच त्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठवूनही त्याला अद्याप मंजुरी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही सार्वजनिक प्रवासी वाहंनामधील पॅनिक बटण दाबल्यानंतरही त्यावर कोणताही प्रतिसाद मिळत नसून व्हेईकल लोकेशन ट्रॅकिंग डिव्हाइस सेंटरमध्ये पॅनिक बटण सेंटर दाखवण्यात आले ते ॲक्टिव्ह नसल्याने राज्यातील पॅनिक बटण यंत्रणा पूर्णपणे निरुपयोगी ठरली आहे त्यामुळे महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी तयार करण्यात आलेल्या यंत्रणेचा उद्देश सफल होत नसल्याने महिलांची सुरक्षितता धोक्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात कंट्रोल सेंटर उभारून पॅनिक बटण यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी आणि जुन्या वाहनांमध्ये पॅनिक बटण बसविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) नियंत्रण कक्षाची उभारणी प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंधेरी (मुबई-पश्चिम) येथे करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) दिनांक ०१/०१/२०१९ पूर्वी नोंदणी करण्यात आलेल्या सार्वजनिक प्रवासी वाहनांना पॅनिक बटण बसविणे बंधनकारक करण्याबाबतचा प्रस्ताव कार्यवाही खाली आहे. दिनांक ०१/०१/२०१९ नंतर नोंदणी करण्यात आलेल्या सार्वजनिक प्रवासी वाहनांना पॅनिक बटण बसविणे बंधनकारक आहे. दिनांक ०१/०१/२०१९ नंतर नोंदणी करण्यात आलेल्या सार्वजनिक प्रवासी वाहनांच्या तपासणी दरम्यान पॅनिक बटण बसविण्यात आले असल्याचे आणि सदर यंत्रणा कार्यान्वित असल्याची पडताळणी करण्यात येते. तसेच सार्वजनिक प्रवासी वाहनांचा परवाना नुतनीकरण, फिटनेस इ. करतेवेळी देखील पॅनिक बटन बसविले असल्याबाबत खात्री करुनच परवाना देण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मानखुर्द (मुंबई) येथील महिलांची मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचे आमिष दाखवून फसवणूक केल्याबाबत

**(२९) * ३५०६ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.संजय केणेकर, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखुर्द (मुंबई) येथील ६५ महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या योजनेचा लाभ देण्याचे आमिष दाखवून खाजगी वित्त संस्थांकडून महिलांनी दिलेल्या कागदपत्रांच्या आधारे बनावट बँक खाती तयार केले व त्याचा सायबर गुन्हयांसाठी वापर करुन परस्पर कर्ज काढून सदर महिलांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा नोंद झाली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात राबविण्यात येत असलेल्या लाडकी बहिण योजनेच्या नावाने सर्वसामान्य महिलांची अडीच हजार बँक खाते तयार करण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले चौकशीच्या अनुषंगाने लाडकी बहीण योजनेंतर्गत महिलांना संभाव्य फसवणूकी पासून रोखण्यासाठी व सदर महिलांच्या नावावरील काढलेले कर्ज रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच उक्त बनावट कागदपत्रांच्या आधारे कर्ज काढणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी मानखुर्द पोलीस ठाणे येथे दिनांक ०६/०४/२०२५ रोजी गु.र.क्र.२०२/२०२५ मध्ये भारतीय न्यायसंहिता, २०२३ मधील कलम ३१८(४), ३(५), अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) आणि (३) राज्यात राबविण्यात येत असलेल्या लाडकी बहिण योजनेच्या नावाने सर्वसामान्य नागरीकांची अडीच हजार बँक खाते तयार करण्यात आलेली नाहीत. तथापि, मानखुर्द, मुंबई याव्यतिरीक्त सोलापूर शहर येथे अधिकृत महा. ई. सेवा केंद्र नसतानाही लाभार्थींकडून अर्ज भरण्यासाठी पैसे स्विकारल्याच्या अनुषंगाने सदर बझार पोलीस ठाणे येथे दिनांक ०६/०७/२०२४ रोजी गु.नों.क्र. ५३६/२०२४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यातील ०२ आरोपींना भारतीय न्यायसंहिता, कलम ३५(३)(१) अन्वये नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच नांदेड येथे वेगवेगळया व्यक्तींचे आधारकार्ड लिंक करुन, लाडकी बहीण योजनेचे शासन अनुदान आपल्या बँक खात्यावर जमा केल्याप्रकरणी मनाठा पोलीस ठाणे जिल्हा नांदेड येथे दिनांक ३०/०९.२०२४ रोजी गु.नों.क्र. १६७/२०२४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात दोन आरोपींना अटक करण्यात आली असून ते जामिनावर मुक्त आहेत. सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे. तसेच सोलापूर (ग्रा.) येथे आर्थिक फसवणूकीच्या अनुषंगाने बनावट अर्जाची कागदपत्रे तयार करुन, शासनाच्या ऑनलाईन पोर्टलवर भरल्याने बार्शी शहर पोलीस ठाणे दिनांक ०४/१०/२०२४ रोजी गु.र.नं. ८४५/२०२४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हा तपासाधीन आहे. तसेच सातारा येथे आरोपी महिलेच्या आधारकार्डचा वापर करुन बनावट अर्जाची कागदपत्रे तयार करुन, शासनाच्या ऑनलाईन पोर्टलवर भरल्याने वडूज पो.ठाणे येथे दिनांक ०३/०९/२०२५ रोजी गु.र.नं. २९३/२०२४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आलेले असून गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

# राज्यातील औद्योगिक वसाहती मधून प्रक्रियेविना सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यामुळे प्रदुषणात वाढ झाल्याबाबत

**(३०) * २३७७ श्री.सुनिल शिंदे, श्री.विक्रांत पाटील, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.राजहंस सिंह, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: तारापुर येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील रासायनिक कारखान्यांतून प्रक्रियेविनाच अनधिकृतपणे नाल्यात सोडण्यात येणाऱ्या रासायनिक प्रदूषित सांडपाण्यामुळे तारापुर आणि परिसरातील १३ ग्रामपंचायती अंतर्गत १६ गावांमधील ८६ सार्वजनिक व ५३६ खासगी पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत प्रदूषित झाले असल्याची बाब तसेच रायगड जिल्ह्यातील अनुक्रमे अलिबाग, पेण, महाड, रोहा, पाताळगंगा, माणगांव, पनवेल परिसरातील औद्योगिक क्षेत्रात अडीच हजारांहून अधिक रासायनिक कंपन्यांचे दूषित पाणी नदी – नाल्यात सोडले जात असल्यामुळे नदी व खाडी प्रदूषित झाल्याने नागरिकांनी व मच्छीमारांनी याबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे वारंवार तक्रारी दाखल करूनही अद्याप कंपन्यांवर कारवाई करण्यात आली नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ वा त्यासुमारास निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पनवेल (जि.रायगड) येथील ८ किलोमीटर अंतरावर वसलेल्या 'तळोजा औद्योगिक वसाहतीमधील' सांडपाण्यामुळे होत असलेल्या प्रदूषणावर उपाययोजना करावी अशी मागणी स्थानिक ग्रामपंचायतीकडून 'महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे' सातत्याने करूनही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याची बाब व औद्योगिक क्षेत्रातील मंजूर असलेल्या कॉक्रीटीकरणाचे व एल.ई.डी. लाईटचे काम, अंतर्गत रस्त्यांची कामे, ट्रक टर्मिनसचे व कचरा व्यवस्थापनाचे कामे देखील प्रलंबित आहेत, हे ही खरे आहेत काय,

(३) असल्यास, खेड (जि.रत्नागिरी) येथील लोटे औद्योगिक वसाहतीतील कारखान्यात प्रक्रिया केल्यानंतर तयार होणाऱ्या घातक घनकचऱ्याची विल्हेवाट बोरज धरणाच्या आजूबाजूला करण्यात येत असून या घातक कचऱ्यामुळे धरणाचे पाणी दूषित असतानाही राज्य प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडून जाणिवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे तसेच मीरा-भाईंदर परिसरातील औद्योगिक वसाहती मधून निघणारे प्रदूषित पाणी विनाप्रक्रिया थेट खाडे बुवा समुद्रात सोडून जलप्रदूषण करण्यात येत असतानाही त्याकडे महानगरपालिका व प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी दुर्लक्ष केले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, औद्योगिक कारखान्यांमधील सांडपाणी भूमिगत पाईपलाईनद्वारे कॉमन इन्क्ल्यूड स्टेटमेंट प्लांट सीईटीपी मार्फत एकत्रित करून त्यावर प्रक्रिया केली जाते व त्यानंतर ते पाणी हरित क्षेत्र करण्यासाठी किंवा धूळ नियंत्रण आटोक्यात आणण्यासाठी वापर केला जातो, मात्र मीरा-भाईंदर येथील सांडपाणी समुद्रात सोडल्याने मोठ्या प्रमाणात जलप्रदूषण होऊन पर्यावरणास हानी पोहोचत आहे तसेच या स्त्रोतामधील रसायनमिश्रित पाणी पिण्यास अयोग्य असल्याने या स्त्रोतांवर जिल्हा परिषद, पालघरने बंदी घातली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील नाल्यात रासायनिक प्रदूषित सांडपाणी सोडणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशतः खरे आहे.
• महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कोणत्याही उद्योगास विनाप्रक्रिया सांडपाणी सोडण्यास परवानगी देण्यात येत नाही.
• जिल्हा आरोग्य अधिकारी, पालघर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार प्राथमिक आरोग्य केंद्र तारापूर, दांडी व मुंरबे अंर्तगत तपासणी करण्यात आलेल्या ३७८ पाणी नमुन्यांपैकी ६ पाणी नमुने दूषित असल्याचे आढळून आले आहे.
• तारापूर औद्योगिक वसाहतीमधील उद्योगांमार्फ़त विनाप्रक्रिया औद्योगिक सांडपाणी नाल्यात सोडत असल्याची तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झालेली नाही.
• रायगड जिल्ह्यातील सर्व उद्योगांनी प्राथमिक, व्दितीय व तृतीय स्वरूपाची सांडपाणी यंत्रणा बसवलेली असून सदर सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या अहवालातील मानके जर विहीत मर्यादेपेक्षा जास्त आढळले तर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फ़त सदर उद्योगांना सुधारणा करण्यासाठी निर्देश दिले जातात.
(२)
• तळोजा औद्योगिक वसाहतीमधील कारखान्यांमधून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर सामुहिक प्रक्रिया केंद्रात प्रक्रिया होऊन प्रक्रियाकृत सांडपाणी राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेने निर्धारीत केलेल्या ठिकाणी सोडण्यात येते.
• महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून प्राप्त अहवालानुसार तळोजा औद्योगिक क्षेत्रातील मंजूर असलेल्या ट्रक टर्मिनसचे काम पूर्ण झाले असून कॉंक्रीटीकरणाचे, एल.ई.डी. लाईटचे काम व अंतर्गत रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) हे अंशतः खरे आहे.
• प्रश्नाधीन विषयाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या चौकशी दरम्यान मे.रिव्हरसाईड इंडस्ट्रीज, प्लॉट क्र. बी-६, एमआयडीसी लोटे या उद्योगाने राख मिश्रीत रसायनयुक्त कचरा टाकल्याचे निदर्शनास आले होते. त्यानुसार उद्योगास दिनांक २५/०४/२०२५ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फ़त प्रस्तावित आदेश देण्यात आले होते. तद्नंतर दिनांक १८/०६/२०२५ रोजी सदर उद्योगास उत्पादन बंद करण्याचे आदेश दिले आहेत. सदर उद्योगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्राप्त निर्देशानुसार, राख मिश्रीत घातक घनकचरा एकूण २३.१३० मे. टन एवढा उचलुन त्याची विल्हेवाट मे. मुंबई वेस्ट मॅनेजमेंट (CHWTSDF), तळोजा येथे करण्यात आली.
(४) व (५) हे अंशतः खरे आहे.
• महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार मिरा भाईंदर कार्यक्षेत्रात रासायनिक सांडपाणी विर्सग करणारे उद्योग अस्तित्वात नाहीत.

• मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार तारापूर औद्योगिक विकास परिसरातील १३ ग्रामपंचायती अंर्तगत असणाऱ्या स्त्रोतामधील पाणी पिण्यास अयोग्य असल्याबाबत फ़लक संबंधित ग्रामपंचायतीमार्फ़त लावण्यात आले आहेत.

• औद्योगिक क्षेत्रातील प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उद्योगांना वेळोवेळी भेट देऊन पाहणी करण्यात येते व पाहणी दरम्यान दोषी आढळून आलेल्या व संमतीपत्रातील अटी व शर्तीचे उल्लंघन करत असल्यास सदर उद्योगांवर नियमांनुसार वेळोवेळी आवश्यक ती कारवाई करण्यात येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोंढवा (पुणे) येथील कत्तलखाना बंद करण्याबाबत

**(३१) * २६८४ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंढवा (जि.पुणे) येथील कत्तलखान्यामध्ये कोणत्याही प्रकारे नियमांचे पालन केले जात नसल्यामुळे कत्तलखाना बंद करण्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पुणे महानगरपालिकेला नोटीस बजाविली असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोंढवा येथील महानगरपालिकेच्या कत्तलखान्यामध्ये दररोज १५० जनावरांची कत्तल केली जात असून, दुर्गंधी व अस्वच्छतेमुळे स्थानिक नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास होत असल्याचे तसेच कत्तलखान्यातील पाणी थेट पिण्याच्या पाण्याच्या वाहिन्यांमध्ये सोडण्यात आल्यामुळे संबंधित वाहिनीही बंद पडून नागरिकांच्या आरोग्याला मोठ्या प्रमाणात धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोंढवा येथील कत्तलखाना बंद करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) कोंढवा कत्तलखाना परिसरातील घरगुती वसाहतींच्या पाणी प्रदूषण व दुर्गंधी बाबतच्या तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक २८/०२/२०२५ रोजी कत्तलखान्याची पाहणी करण्यात आली. पाहणी दरम्यान सांडपाण्याचे नमुने हे कत्तलखान्यास संमतीपत्रामध्ये घालून दिलेल्या मानकांच्या प्रमाणापेक्षा अधिक असल्याचे आढळून आल्याने कत्तलखान्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक २८/०२/२०२५ रोजी प्रस्तावित निर्देश देण्यात आले होते. तद्नंतर कोंढवा कत्तलखान्याची दिनांक ०२/०४/२०२५ रोजी वैयक्तिक सुनावणी घेऊन कत्तलखाना बंद करण्याचे आदेश दिनांक ०८/०५/२०२५ रोजी देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वणी, सप्तश्रृंगीगड (जि.नाशिक) येथे सुरक्षा व्यवस्थेतील नियोजनाअभावी गोंधळसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याबाबत

**(३२)** * **२३४६ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी, सप्तश्रृंगीगड (जि.नाशिक) येथे चैतन्य उत्सवानिमित्त दिनांक ११ एप्रिल, २०२५ रोजी ९ लाख भाविकांची नियोजनाअभावी गर्दी झाली असल्याने तसेच पोलीस व स्थानिक प्रशासन यांच्यात समन्वय नसल्याने वाहतूक व अन्नपाणी व्यवस्थेचा अभाव, महिला व बालकांची होणारी अडचण यामुळे भक्तगणांना लाठीमार, गोंधळ व चेंगराचेंगरीचा सामना करावा लागल्यामुळे हजारो भाविकांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वणी येथे नियोजनाअभावी निर्माण झालेल्या गोंधळसदृश्य परिस्थितीस जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच भविष्यात असे गैरप्रकार घडू नयेत यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नाही

दिनांक ११/०४/२०२५ रोजी चैत्र उत्सव यात्रे निमित्त संपूर्ण सप्तश्रृंगी गड परिसरात एकूण २ ते २.५ लाख भाविकांची गर्दी झाली होती.

सदर ठिकाणी चैत्र यात्रा उत्सव चालू होऊन ते संपेपावेतोचे कालावधीत पोलीस प्रशासन व सप्तश्रृंगी गड ट्रस्ट कार्यालयाकडील सिक्युरिटी गार्ड तसेच एम.एस.एफ. सुरक्षा रक्षक व स्वयंसेवक यांचा कडीकोट बंदोबस्त लावण्यात आल्याने भक्तगणांना लाठीमार गोंधळ व चेंगराचेंगरी असा प्रकार घडला नसून भाविकांच्या जीवितास धोका निर्माण होईल असा प्रकार घडला नाही.

संपूर्ण यात्रा उत्सव कालावधीत नांदुरी ते सप्तश्रृंगी गड येथे संपूर्ण खाजगी वाहने जाणे येण्या करीता जिल्हाधिकारी यांचे लेखी आदेशान्वये वाहनास प्रवेश बंद ठेवण्यात येते. सदर खाजगी वाहनांची पार्किंग व्यवस्था ग्रामपंचायत नांदुरी यांचे मार्फतीने नांदुरी गावात केली जाते. तसेच महिला व बालके यांचेकरीता आपत्ती व्यवस्थापन स्वतंत्र पथक तसेच वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचे महत्वाच्या ठिकाणी कॅम्प लावण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** 
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.